**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on "*Sustainable Development Goals*"**

# भारतीय समाजातील लिंगभाव

**मोकासरे गणेश तुकाराम,**
*सहायक प्राध्यापक,*
*सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव*
*Email: gtmokasare@gmail.com*

*संक्षिप्त गोषवारा (Abstract) :*

लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरूषांची बाईपणात व पुरूषपणात होणारी सामाजिक वर्गवारी भेदभाव सूचित होतो. तर लिंग ही जैविक संकल्पना असून ती मध्ये स्त्री पुरूषातील शारीरिक किंवा जैविक फरक निर्देशीत केला जातो. भारतात स्त्री पुरुष भेदभाव मोठया प्रमाणात केला जातो. मानव विकास निर्देशांक, जेंडर गॅप, शाळेतील गळतीचे प्रमाण, स्त्री साक्षरता, स्त्रीभ्रुण हत्या, महिला हिंसा यातुन तो स्पष्ट दिसून येतो.त्यामागची प्रमुख कारणे म्हणजे पुरुष प्रधान संस्कृती, जाती धर्माचा प्रभाव, सांस्कृतिक प्रथा-परंपरा, पुरुषी मानसिकता, निरक्षरता, जनजागृतीचा अभाव इ. आहेत. भारतातील लिंगभाव समस्या सोडवण्यासाठी पुरुषप्रधान संस्कृती एवजी आदर्श मातृसत्तक पध्दत स्वीकारणे गरजेचे आहे, कायदयाचे अधिकार मिळालेत पण त्याबद्दलची जाणीव जागृती होणे गरजेचे आहे, ग्रामीण महिलांमध्ये शिक्षणचे प्रमाण वाढायला हवे, स्त्रीवादी चळवळ अधिक प्रभावीपणे राबवणे व पुरुषांनी स्वार्थी दृष्टीकोन सोडून महिलांना समानसंधी उपलब्ध करुन देउन त्यांचा राजकीय सहभाग वाढवणे गरजेचे आहेत.

**की वर्ड: लिंगभाव, भारतीय समाज**

**प्रस्तावना:**

स्त्री ही समाजातील एक महत्वपुर्ण घटक आहे. ती एक नवनिर्मिती आहे. प्राचीन काळापासूनच तीच्याकडे एक देवता म्हणून बघितल्या जाते. यंत्र पुज्यंते नारी तत्र रमयंते देवता असे तीचा गौरव करणारे श्लोक ही आपल्याला प्राचीन धर्मग्रंथात आढळतात. परंतु प्रत्यक्षात मात्र भारतीय समाजात तीची अवहेलनाच झालेली दिसते. कौटुबिक हिंसचार, बलात्कार, हुंडा, हॉनर किलींग यासारख्या घटना समाजात दिवसेंनदिवस वाढतांना दिसत आहे. प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक म्हणून घेणा-या समाजात स्यिांचे स्थान दुय्यमच राहिलेले आहेत. वैदिक काळ वगळता उत्तर वैदिक काळ, मोगलकाळ, ब्रिटीश राजवट यासर्व काळखंडात स्त्रियांचे शोषण होतच राहिले आहे. मैथिलीशरण यांच्या कवितेतील पंक्ती याचे योग्य वर्णन करतांना दिसतात, 'अबला तेरी यह काहानी ऑचल मे दूध और ऑख मे पानी', राजस्थान येथील लोकगीत- 'हे भगवान मै तुम्हे बिनती करू पैर पडू बार बार, अगले जनम मोहे बेटी मत बनाव चाहे दिजीए नरक व्दार', या लोकगीतातून आपल्याल महिलांच्या दु:खाचे गार्भीय लक्षात येउ शकते.

**उद्येश:**

१. भारतातील लिंगभावाची स्थिती जाणून घेणे.
२. भारतातील लिंगभावाची कारणे जाणून त्यावर उपाय सुचविणे.



Scanned with CamScanner

**अध्ययन पध्दती:**

सदरील पेपर तयार करतांना व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, मासिके, इंटरनेट या स्त्रोतांचा वापर करूर वर्णनात्मक स्वरूपाची मांडणी करण्यात आली आहे.

**लिंगभाव:**

'लिंगभाव या संज्ञेचा वापर स्त्री आणि पुरूषाची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी करतात. स्त्री आणि पुरूषाचे स्थान व भूमिका यात समाजात कसा भेद केला जातो, याचे या संज्ञेमुळे आकलन होते.म्हणजे स्त्री पुरूषासंबधीच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषनाचे एक साधन म्हणून ही संकल्पना वापरली जाते.'[1]

प्रत्येक समाजात व्यक्तीला समाजिकरणाच्या प्रक्रीयेव्दारे स्त्री व पुरूष म्हणून घडवीले जाते. समाजातील वेगवेगळया भूमिका, जबाबदा-या, पेहराव, अपेक्षा व वर्तनप्रकार यांच्या माध्यमातून व्यक्तीला स्त्री व पुरूष बनवले जाते. लिंग ही संकल्पना लिंगभावापेक्षा वेगळी आहे. ती जैविक संकल्पना असून ती मध्ये स्त्री पुरूषातील शारीरिक किंवा जैविक फरक निर्देशीत केला जातो.

'लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम मांडली ती ॲन ओकले या स्त्रीवादी विचारवंताने . तीने आपल्या सेक्स, जेंडर ॲंड सोसायटी या ग्रंथामध्ये या संकल्पनेवर सविस्तर प्रकाश टाकलेला आहे. तीच्या मते, **स्त्री ही जन्माला येत नसते, तर तीला बनवली जाते.** ओकले यांच्यामते लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरूषांची बाईपणात व पुरूषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित होते. एखादी व्यक्ती स्त्री किंवा पुरूष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाईपण व पुरूषपण मात्र सांस्कृतिक निकषांवरून ठरते. म्हणजे लिंग हे वैशिष्टय स्थिर असते. लिंगभव मात्र बदलत असतो.'[2]

**भारतातील लिंगभाव असमानता:**

'युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या मानव विकास निर्देशांक अहवाल २०१९ नुसार भारताचा -१२९ वा क्रमांक आहे.'[3] २०१६च्या मानव विकास निर्देशांक अहवालानुसार भारतातली महिलांचे दरडोई वार्षिक उत्पन्न केवळ २१८४ आहे तर पुरूषांचे ८८९७ एवढे आहेत तर हेच प्रमाण नार्वे या देशाचे जो मानव विकास निर्देशांकात प्रथम आहे. तेथे महिलांचे उत्पन्न ५०८०० तर पुरूषांचे ७५३१४ एवढे आहे. यावरुन भारतातील महिलांचे स्थान हे समाजात व आर्थिक क्रीयांमध्ये नगन्य असल्याचे दिसते. 'World Economic Forum च्या २०२० च्या ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स नुसार भारताचा १५३ देशाच्या यादित ११२ वा नंबर आहे. जो २०१८च्या इंडेक्यपेक्षा ४ अंकानी आणखी खाली आलेला आला आहे. या इंडेक्सचे जे चार उप इंडेक्स आहेत ज्यावरुन या इंडेक्सचे मोजमाप केले जाते. त्यात Economic participation and opportunities याउप इंडेक्स मध्ये भारताचा क्रमांक १४९ आहे, educational attainment- ११२ वा, Health and Service -१५०, तर Political Empowerment मध्ये १८ वा क्रंमांक आहे.'[4] यावरुन जागतीक तुलनेत भारतीय स्त्रीया हया किती मागे आहेत हे दिसते आणि हे सर्व भारतातील लिंगभाव भेदभावाचे परीणाम आहेत.



Scanned with CamScanner

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

'भारतामध्ये संसदेत आजही महिलांना ३३% आरक्षण मिळालेले नाहीत. त्यामुळे भारतात १६ व १७ व्या लोकसभेच्या निवडनुका वगळता कोणत्याही निवडनुकीत १०% पेक्षा अधिक महिला निवडून आलेल्या नाहित. १७ व्या लोकसभेच्या निवडनुकेत ७८ महिलांचा समावेश संसदेत झालेला आहे. तर १६ व्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेला ६२ स्त्रीयांचा समावेश संसदेत होता.'[5] यावरुन भारतीय महिलांचे राजकीय प्रक्रीयेतील सहभाग नगन्य असल्याचे दिसते. ७३ व ७४ -व्या घटनादुरूस्तीमुळे भारतील महिलांना ३३% आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मिळाले आहे व आलिकडच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५०% आरक्षण मिळायला सुरवात झाली आहे. ही एक आशादायी बाब आहे.

भारतात शिक्षणातही स्त्री पुरूष तफावत खुप मोठयाप्रमाणत दिसते. '२०११ च्या जनगनणेनुसार भारताची एकुण साक्षरता ७४.४% आहे. त्यामध्ये पुरूष साक्षरता ८२.१४% आहे तर स्त्री साक्षरता तर स्त्री साक्षरता केवळ ६५.४६% आहे.त्यातल्या त्यात राजस्थानमध्ये ५२.७% तर बिहारमध्ये ५३.३३% एवढीच स्त्री साक्षरता आहे.'[6] आजच्या २१ व्या शतकात ही एक चिंतेची बाब आहे. 'Children in India-2018 च्या अहवालानुसार २०१५-१६ मध्ये ८१% मुलीच १० व्या वर्गापर्यंत पोहचतात तर शिक्षण ५६%. मुलीच १२ व्या वर्गापर्यंत पोहचतात.'[7] तसेच Pratham Annual Survey of Education Report नुसार 'भारतात १८ वर्षापर्यंच्या ३२ % मुर्लींची तर २८% मुलांचा शाळेत प्रवेश झालेला नसतो.'[8] तर ग्रामीण भारतात हे चित्र अधिकच विदारक आहे. शाळकरी मुर्लींपैकी अनेक मुर्ली हया १२ व्या वर्गापर्यंत पोहचतच नाही. यावरून स्त्रीयांचा शिक्षणातील गळतीच्या प्रश्नाचे गांभीय लक्षात येते. हे सर्व प्रश्न लिंगभावातून निर्माण झालेले आहेत. हे ही लक्षात घेणे गरजेचे आहे. २०११च्याच जनगणनेनुसार भारतात लिंगगुणोत्तर हे ९४० आहेत म्हणजे दर हजारी पुरुषामागे ६० मुली कमी आहेत. हरीयाना बिहार राजस्थान, पंजाब आशा काही राज्यातील ग्रामीण भागातील मुर्लींचे तुलनेने खूप कमी आहे. स्त्री ही नकोशी असून तीला गर्भातच संपवले जाते. स्त्री भ्रुण हत्या ही भारतातील एक गंभिर समस्या बनली आहे.

भारतासारख्या विकसनशील देशत आजही बहुतांश महिलांचे श्रम हे गैरमोद्रिक स्वरुपाचे आहेत. पुरूषांना मात्र त्यांच्या कामाचा मोबदला पैशाच्या स्वरूपात मिळतो. बहुतांश महिला मात्र आजही चुल आणि मुल या परीघामध्येच वावरतांना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कामाचे मोल होत नाही. तसेच बहुतांश महिलांचे श्रम हे बाजारापर्यंत पोहचतच नाही. त्यामुळेही त्यांना त्याचे मूल्य मिळत नाही. मुल्य न मिळाल्याने त्यांचे वैक्तिक उत्पन्न निर्माण होत नाही. परीणामी त्यां कौटुंबिक व राष्टीय उत्पन्नामध्ये आपले योगदान देउ शकत नाही. १९९५ च्या संयुक्त राष्ट्राच्या मानव विकास अहवालानुसार, गैरमोद्रिक श्रमामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला १६अरब डॉलर नुकसान झाले होते. यामध्ये ११ अरब डॉलर नुकसान केवळ महिलांच्या गैरमोद्रिक श्रमामुळे झाले होते.

Fifth Annual Empoyment- Unemployment Survey 2015-16 च्या अहवालानुसार भारतामध्ये फिमेल लेबर फोर्स पार्टीशीपेशन रेट जवळपास २७.७% आहे तर पुरषांचा ७५% आहे हे भारतातील स्त्रीपुरुष असमानतेचे खुप मोठे उदाहरण आहे.भारतातील महिलांच्या संदर्भात आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे उत्पन्नाच्या साधनांवर किंवा कौटुंबिक संपत्तीवर त्यांची मालकी नसणे हे होय.

याशीवाय भारतातील महिलांना जात, धर्म व पुरुषप्रधान संस्कृतिच्या वेढयात गुतंवून ठेवल्यामुळे त्यांच्यात उद्योजकता गुण विकसित झाला नाही व भारतात फारश्या महिला उद्योजक निर्माण होउ शकल्या नाहीत. नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या- ६ व्या आर्थिक अहवालानुसार भारतात केवळ १४% महिला उद्योजक आहेत.भारतात एकुण ५८.५ दशलक्ष



Scanned with CamScanner

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

उद्योग असून त्यापैकी केवळ ८.०५ दशलक्ष उद्योग महिलांकडून चालवीले जातात. Global Women Entrepreneurs Leader Report-2015 नुसार महिला उद्योजकतेच्या संदर्भात ३१ देशांच्या यादित भारताचा २९ वा क्रमांक आहे.यामध्ये नायजेरीया, उगांडा, घाना हे देशही भारताच्या पुढे आहे.

**सारांश:**

वरील विवेचनाहून असे दिसून येते की, भारतामध्ये लिंगभाव असमानता मोठयाप्रमाणात दिसून येते. ह्युमन डेव्हलपमेंटइंडेक्स, जेंडर गॅप इंडेक्स, लेबर पार्टीशीपेशन फोर्स, स्त्री साक्षरता, शिक्षणातील गळतीचे प्रमाण, उत्पादन साधनांवर त्यांची नसलेली मालकी, स्त्री पुरूष प्रमाण, स्त्रीयांचे राजकीय प्रक्रीयेतील सहभाग यामध्ये भारतातील लिंगभावाचे प्रतिबींब दिसून येते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे पुरुष प्रधान संस्कृती, जाती धर्माचा प्रभाव, सांस्कृतिक प्रथा-परंपरा, पुरुषी मानसिकता, निरक्षरता, जनजागृतीचा अभाव इ.आहेत. भारतातील लिंगभाव समस्या सोडवण्यासाठी पुरुषप्रधान संस्कृती एवजी आदर्श मातृसत्तक पध्दत स्वीकारणे गरजेचे आहे, कायदयाचे अधिकार मिळालेत पण त्याबद्यलची जाणीव जागृती होणे गरजेचे आहे, ग्रामीण महिलांमध्ये शिक्षणचे प्रमाण वाढायला हवे, स्त्रीवादी चळवळ अधिक प्रभावीपणे राबवणे व पुरुषांनी स्वार्थी दृष्टीकोन सोडून महिलांना समानसंधी उपलब्ध करुन देउन त्यांचा राजकीय सहभाग वाढवणे गरजेचे आहेत.

**संदर्भ सुची:**

[१] तांबे श्रुती, २०१० अनु. लिंगभाव समजून घेतांना, लोकवाङ्मय गृह, मुंबई. पेज-९
[२] तांबे श्रुती, २०१० अनु. लिंगभाव समजून घेतांना, लोकवाङ्मय गृह, मुंबई. पेज-१०
[3] Human Development Report -(2019)- United Nation Development Programme-Page-32.
[4] Global Gender Gap Report-(2020) World Economic Forum Page-9
[5] www.women .member-loksabha.in, dated-30.01.20
[6] Censusindia.gov.in2011
[7] Children in India Report 2018- page-99.
[8] Annual Status of Education Report(Rural)-2017 page- 62



Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

Guest Editor :
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

Associate Editors -
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रा. आर. बी. काळे**
समाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई

**प्रा. जी. टी. मोकासरे**
सुदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाच्या विकासाचे भवितव्य हे त्या देशातील लहान बालकावर असते. कारण ते बालक मोठे होऊन देशाचे आधारस्तंभ बनतात. जसे की देशाचे नेते, संशोधक, व्यापारी, खेळाडू, सैनिक, शिक्षक, चांगले नागरीक ज्यामुळे राष्ट्रीय संपत्ती निर्माण करणे व संपूर्ण राष्ट्राची काळजी व संरक्षण करतात, व नवसमाज निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असते. 'भारतीय राज्यघटनेच्या १४, १५, १२ ए, २३, २४ (ई) ३९ (फ) या कलमामध्ये बालकाची वाढ आणि विकास या विषयी तरतूदी आहे.

अलीकडील काही वर्षापासून गुन्हेगारी विश्वात बालकाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बालकांचा गुन्हेगारी विश्वातील वाढता सहभाग ही समस्या आता जागतिक समस्या झाली आहे. तसेच दिवसेंदिवस ती अधिक गंभीर स्वरुपात वाढत चाललेली आहे. जागतील विविध राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला. भारताने देखील औद्योगिकीकरणाने वेग घेतलेला दिसून येतो. औद्योगिक केंद्रीकरणामुळे नागरीकरणात देखील झपाट्याने वाढ झाली आहे. आधुनिक काळात नगरांच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. देशाचा चेहरा जसा विकासाचा आहे तर दुसरा चेहरा विविध सामाजिक समस्याचा आहे. आधुनिक काळात ठळकपणे लक्षात येणारी समस्या म्हणजे बालगुन्हेगारी.

**उद्देश :-**

१) भारतातील बालगुन्हेगारीचा आढावा घेणे.
२) बालगुन्हेगारीच्या कारणाचा अभ्यास करणे.
३) बालगुन्हेगारीवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करुन तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच दुय्यम तथ्य संकलन स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे.

**सैध्दांतीक चौकट :-**

एडविन सुदरलॅंड आणि डोनाल्ड क्रेझी यांनी 'विभेदित साहचर्य' या आधारावर बालगुन्हेगारी विषयी मांडणी केली आहे. 'विभेदित सहाचर्य' या शब्दातून असे सांगायाचे आहे की व्यक्ती ज्यांच्या संगतीत राहील, म्हणजे तिचे साहचर्य प्रस्थापित होईल त्याच लोकांचे वर्तन प्रकार, मुल्ये, श्रध्दा, नियमणे इ.गोष्टीचे संपादन त्या व्यक्तीकडून होईल. मुल जेव्हा चांगल्या मुलांच्या संपर्कात राहून वर्तन करेल तेव्हा ते वर्तन अनुचलनात्मक स्वरुपाचे होईल. पण याउलट मुले जर वाईट वा विचलनात्मक वर्तन करणाऱ्या लोकांच्या सतत संपर्कात आली तर ती मुले देखील विचलनात्मक वर्तन करणारीच होईल. मुले जर इतर बालगुन्हेगारांच्या संगतीत रहिली तर ती ही बालगुन्हेगारच होतील. थोडक्यात, ज्यांच्याशी घनिष्ठ साहचर्य प्रस्थापित होईल त्यांच्याकडून अधिक प्रभावीरित्या व्यक्तीचे समाजीकरण घडून येईल व तसे प्रत्येकाचे वर्तन निश्चीत होते.



Scanned with CamScanner

क्लिफोर्ड शॉ आणि हेरी मॅक के. यांच्या मते समाजीकरणात सामन्य मुले समाजातील रुढ नियमानुसार वागण्यास शिकतात. समाजमान्य वर्तन प्रकाराचे समाजीकरणात समाजातील सर्व मुलांकडून अध्ययन होते. पण ते विचलनात्मक मानलेल्या वर्तन प्रकाराचे अध्ययन असते. समाजाच्या आदर्श संस्कृतीचे समाजीकरणाव्दारे जसे संक्रमण घडून येते अगदी त्याच प्रमाणे बालगुन्हेगारी संस्कृतीचे समन्यक बालगुन्हेगारांच्या समूहाव्दारे संक्रमण घडून येते.

**बालगुन्हेगारीचा अर्थ :-**

**न्युमेयर :-**

'बालगुन्हेगारी म्हणजे कायद्याने निर्धारीत केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेली व्यक्ती,ज्या व्यक्तीचे वाईट वर्तन समाजविरोधी आणि कायद्याचे उल्लंघन करणारे असते.'

**मार्शल बी क्लिनार्ड :-**

'विशिष्ठ वयाखालील विशेषत : १६ ते १८ वर्षाखालील व्यक्तीनी इतर व्यक्तींना किंवा समाजाला घातक ठरेल अशा रितीने केलेले समाज विरोधी कृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय.'

**विल्यम एच शेल्डन :-**

'बालगुन्हेगारी म्हणजे समाजाच्या अपेक्षित अपेक्षाचा भंग करणारे बालकांचे वर्तन.'

वरील व्याख्यानुसार असे दिसुन येते की कायद्याच्या वयाच्या अटीत बसणाऱ्या व्यक्तीने केलेले समाजविरोधी कृत्य हे बालगुन्हेगारीच्या निर्मीतीस कारणीभुत ठरते. बालगुन्हेगारीमध्ये फक्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बालकांनाच नव्हे तर समाजविरोधी वर्तन करणाऱ्या बालकाचाही समावेश दिसुन येतो. म्हणूनच बालगुन्हेगारी या समस्येच्या अंतर्गत फक्त कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या बालकाबरोबर समाजविघातक कृत्ये करणाऱ्या बालकांचा समावेश होतो.

**भारतातील बालगुन्हेगारीची स्थिती :-**

आजचा बालक असो व तरुण हा उद्याचा सुजान नागीक असतो. या युवा पिढीवरच देशाची आर्थीक सामाजिक प्रगती अवलंबून असते. आजची युवा पिढी सक्षम असणे अतिशय आवश्यक आहे. परंतु गुन्हेगारीचे बदलते स्वरुप पाहता सद्यस्थितीत देशात अल्पवयीन मुले तरुण होण्याच्या आधिच गुन्हेगारीकडे वळत आहे. भारतात एकूनच गुन्हेगारीत प्रचंड अशी वाढ होत आहे. छोट्या -मोठ्या चोऱ्या, घर फोड्या, खुन,दरोडे, विशेषत अल्पवयीन मुलांकडून बलत्कार, या सारख्या गुन्हायामध्ये वाढ ोत आहे. "देशामध्ये २०१० साली २२७४० बाल गुन्हेगाराची संख्या होती. २०११ मध्ये २५१२५ तर २०१२ मध्ये २७९३६ एवढी तर २०१३ मध्ये ३१७२५ व २०१४ मध्ये ३३५२६ एवढी बालगुन्हेगाराची संख्या होती. बाल गुन्हेगारी इंडियन पॅनल कोड (IPC) नुसार २०१० ते २०१४ पर्यंत ४७ टक्के बालगुन्हेगारी वाढली आहे.

या वरुन असे लक्षात येते की भारतामध्ये बालगुन्हेगारी समस्येचे विदारक चित्र निर्माण झाले आहे.

**बालगुन्हेगारीचे कारणे :-**

*** कौटुंबीक कारण :-**

समाजीकरणाचे साधन म्हणून कुटुंबाला महत्त्व आहे. मुलांच प्राथमिक सामाजीकरण कुटुंबातच मुख्यत होते. कुटुंबातील आई-वडील,मोठे भावंडे यांच्याकडून मुलांचे सामाजीकरण होते. समाजातील शिस्तीचे नियम, इतर नियमणे, मूल्ये याचे ज्ञान कुटुबांत होते. भावी काळात करावयाच्या काही भुमिका मूल कुटुबात शिकते. त्यामुळेच कुटुंबातील व्यक्तीकडून अत्यंत प्रमाणीकरीत्या समाजीकरण नीट झाले नाही तर त्यांच्या व्यक्तीमत्त्वात गंभीर उणीवा राहू शकतात. आधुनिक काळात कुटुंब पध्दतीत मोठ्या प्रमाणात विघटन होत असल्यामुळे कुटुबपध्दतीत लहान मुलांवर लक्ष ठेवण्यास



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
October-2019

आणि त्यांच्यावर संस्कार करण्यास मर्यादा येतात. लहान मुले अनुकरणप्रिय असतात. कुटुंबातील सदस्याची व्यसनधीनता, भांडणे, चुकीचे वर्तन यांचा प्रभाव मुलांवर पडणे स्वभाविक आहे. पती-पत्नी मधील भांडण, घटस्फोट, अनैतिक संबध या बाबी बालगुन्हेगार निर्माण करण्यास जबाबदार ठरतात.

**समाजिक माध्यमे :-**

मोबाईलमध्ये इंटरनेट, चित्रपट सुविधा अशा माध्यमातून मुले चांगल्या गोष्टी न घेता वाईट गोष्टीकडे लवकर आकर्षीत होतात. ज्या वयात योग्य संस्कार व्हायला पाहिजे ते मात्र होताना दिसत नाही. आई-वडील दोघेही नोकरी, व्यवसाय निमीत्ताने दिवसभर बाहेर राहतात अशा वेळेस बालके घरी एकटेच राहत असल्यामुळे चित्रपट,गुन्हेगारीच्या मालिका, अश्लिल चित्रपट यातील पात्राचे अनुकण करण्याच्या प्रयत्नातून अपहरण, मारामारी, धुम्रपान,खुन,बलात्कार अशा घटना करण्याचा प्रयत्न करतात म्हणून त्यांच्याकडून गून्हे घडून बालगुन्हेगारीचा प्रश्न निर्माण होतो.

**आर्थीक कारण :-**

भारतातील अनेक सामाजिक समस्या या आर्थीक कारणामुळे निर्माण होतात. बालगुन्हेगारी हे सुध्दा त्याचेच एक कारण आहे. मुलांच्या प्राथमिक गरजा भागविल्या जात नसतील तर मुलांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. गरीब - श्रीमंतामधील दरी अशा गोष्टी त्यांना समाजविरोधी वर्तन करण्यास भाग पाडते. आर्थीक परिस्थिती त्यांच्या गरजांच्या पूर्ण करत नाही तेव्हा या मुलांच्या हातुन छोटी - मोठी चोरी करुन गरजा पूर्ण करीत असतात. हळूहळू त्यांना अशा प्रकारची समाज विरोधी वर्तन करण्याची सवय लागून ती बळावली जाते.

**सामाजिक वातावरण :-**

लहान मुलांवर केवळ कुटुंबाच्या माध्यमातून सामाजीकीकरण घडवून येते असे नाही तर सभोवतलच्या सामाजिक परिसराचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष स्वरुपात मुलांवर प्रभाव पडत असतो. जर आजूबाजूच्या सामाजिक परिसर असंस्कारक्षय असेल तर मुलांना आपोआप या परिस्थितीत वाईट गोष्टी, संगत करुन शिकायला वेळ लागत नाही. झोपडपट्टीच्या क्षेत्रात जुगार, मद्यपान, धुम्रपान, व्याभिचार, अनैतिकता, चोऱ्या, शिव्या, अश्लिल शब्दाचा उच्चार या सारख्या बाबी सातत्याने घडत असतात याचाच परिणाम कळत नकळत मुलांवर होवुन मुले त्या प्रवृत्तीकडे झूकून जातात.

**औद्योगिकीकरण व नागरीकरण :-**

भारत देश हा महासत्तेकडून वाटचाल करत असून त्याच बरोबरीने औद्योगिकीकरण व नागरीकरणामध्ये वाढ होत आहे. परंतु त्याचबरोबर वाढत्या नागरीकरणाबरोबर गलिच्छ वस्त्या, झोपडपट्टी, गुन्हेगारी, मद्यपान, वेश्यालये इ. समस्यांची वाढ होत चालली आहे कारण उद्योगधंद्यांच्या ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने ग्रामिन भागातून नागरी भागामध्ये स्थलांतराची वृत्ती वाढली आहे. जागेच्या टंचाईमुळे झोपडपट्यासारख्या भागात गरीब, श्रमीकवर्ग, अकुशल कामगार, भिकारी इ. लोक राहतात. परंतु ज्याच्यांकडे वेळ नाही त्यांच्या मुलाकडे आपोआप दुर्लक्ष होते. यामुळे मुलांमध्ये समाजीकीकरण संस्कार या गोष्टी रुजत नसल्यामुळे त्यांच्याकडून समाजविरोधी वर्तन, मद्यपान, स्वैराचार, गुन्हेगारी करण्याकडे प्रवृत्ती वाढते त्यातून बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

**उपाययोजना :-**

बालगुन्हेगार आणि प्रोढ गुन्हेगार यांच्यात फरक असतो. आजचा बालगुन्हेगार उद्याचा मोठा गुन्हेगार होवु नये यासाठी विविध देशामध्ये बालगुन्हेगारी सुधार कार्यक्रम राबविले जातात. भारतात या संदर्भात राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमामध्ये १९२७ मध्ये मुंबईमध्ये बाल न्यायालयाची स्थापना करण्यात आली, बाल अभिक्षण गृह, भारतात जिल्हा


Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
October-2019

स्तरावर बालसुधार संस्था निर्माण करण्यात आली आहे. सुधार शाळा, परिवीक्षा वसतीगृह किशारे सुधारगृह, अट्टल बालगुन्हेगारांना भविष्यातील गुन्हेगार बनन्यापासुन वाचविण्यासाठी बालग्राम योजना अंमलात आणली आहे.

परंतु मुळातच बालगुन्हेगार निर्माण होवु नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी बालकांचे योग्य समाजीकीकरण होणे आवश्यक आहे. कारण समाजीकीकरणाच्या प्रक्रियेतून भूमिका पार पाडत असतो. त्यासाठी कुटुंब, शेजारी शाळेमध्ये या विषयी सुधारणा होणे आवश्यक आहे. मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्यास आर्थीक कारणामुळे होणाऱ्या बालगुन्हेगारीच्या समस्या कमी होतील. सोशल माध्यमातून दाखविल्या जाणाऱ्या वाईट गोष्टी तसेच मोबाईलमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून येणाऱ्या अश्लिल जाहिराती चित्रपट न दाखविणे यामुळे लहान मुलांवर त्याचा परिणाम होणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने वागणे जेणे करुन सामाजीक पर्यावरणाचा चांगला परिणाम मुलांवर होवुन मुले गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर राहतील. एवढेच नाहीतर नैतिक, मुल्ये, नियमणे शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून मुलांमध्ये रुजविल्यास बालगुन्हेगार निर्माण होणार नाही. तसेच सर्व शाळा, महाविद्यालयामध्ये लहान बालकापासुन ते युवकापर्यंत्न संवाद साधून मुलांच्या मनातील भावनांना वाट मोकळी करुन देणे.

**सारांश :-**

थोडक्यात बालगुन्हेगारीची समस्या ही कोणत्याही देशाच्या विकासामध्ये घातक ठरत आहे. समाजशास्त्रीय सैध्दांतीक मांडणीवरुन असे लक्षात घेता येते की सामाजिक विचलन ज्या कारणामुळे होते त्यामध्ये समाजीकीकरण ही प्रक्रिया सर्वात महत्त्वाची आहे. त्यामुळे बालगुन्हेगारी निर्माण न होण्यासाठी आदर्श संस्कृतीचे समजीकरणाव्दारे संक्रमण घडून येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येकाचे अनुचलनात्मक वर्णन निश्चीत होईल. गुन्हेगारीच निराकारण होण्यासाठी एकदंरीत सामाजिक परिस्थितीत परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१. कुलकर्णी, पी.के, भारतातील सामाजिक समस्या, १९९८ विद्या प्रकाशन, नागपुर.
२. साळुखे सर्जेराव, मुलभूत समाजशास्त्रीय संकल्पना, २००० नरेद्र प्रकाशन, पुणे.
३. आहूजा, राम, सामाजिक समस्याएें, २००० रावन पब्लिकेशन, जयपूर.
4. www.tarunbharal.com,dated 02/09/2019.
5. www.indiaspend.com dated 03/09/2019.



Scanned with CamScanner

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# वृद्धांच्या समस्या कारणे आणि उपाय





संपादक
डॉ.बाळासाहेब मुंडे

Scanned with CamScanner

25) वृध्दांच्या समस्या व निर्मितीचे कारणे
डॉ. ज्ञानोबा दशरथ फड ||87

26) Legal & Constitutional Framework Of Older Persons In India: An Overview
Mihir Umesh Inamdar, Pune ||89

27) भारतातील वृद्ध समस्येची कारणे व वृद्ध कल्याणकारी कार्यक्रम
प्रा. डॉ. सिद्धेश्वर रा. शेटकर, लातूर ||93

28) वृध्दांच्या समस्यांची कारणे व परिणाम
प्रा.डॉ. पंढरी व्यंकटी गुट्टे, परळी-वैजनाथ ||96

29) वृद्धासंबंधीचे कायदे आणि योजना
डॉ. साधना विजय लांजेवार, नागपूर ||98

30) Old Age Problems Indian Perspective
Dr. Balaji P. Munde, Jalna ||101

31) वृद्धांच्या समस्या : कारणे, परिणाम आणि उपाय
प्रा.डॉ. दामावले डी. एन., लातूर ||104

32) वृध्दांच्या समस्या आणि महाराष्ट्र शासनाचे वृध्दांसाठीचे कल्याणकारी कार्यक्रम
डॉ.दिलीप सिताराम मस्के, अंबाजोगाई ||107

33) वृध्दांच्या समस्या :- कारणे आणि उपाय
डॉ.सुनिल जाधव, प्रा.भोसले ए.आर, बीड ||110

34) भारतातील वृध्दांच्या समस्या
मोकासरे गणेश तुकाराम, माजलगाव ||113

35) Problems, Causes and Remedies of the Elderly
Ms. Pratima Kamlakar Kamble, Nanded ||115

36) Problems of the Aged People in India: An Analysis
Prof. Balaji Pidge, Osmanabad ||118

37) वृध्दांच्या समस्या आणि उपाय
प्रा. धिमधीमे किरण कुमार मोहन, केज ||121



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

34

# भारतातील वृध्दांच्या समस्या

**मोकासरे गणेश तुकाराम,**
समाजशास्त्र विभाग,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना :**

भारताची ओळख तरूणांचा देश म्हणून आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये भारतात वृध्दांची संख्याही झपाटयाने वाढत आहे त्यामुळे ही भारतासाठी गंभीर बाब आहे. त्यातल्या त्यात वृध्दांकडे होणारे दुर्लक्ष व त्यांच्या वाढत्या समस्या यामुळे ही समस्या दिवसेंनदिवस उग्र बनत आहे.पुर्वी भारतामध्ये आई वडीलांकडे देवा समान बघीतले जात होते. मातृ पितृ देवो भवः असे संबोधल्या जायचे. आई वडीलांची सेवा करणार श्रावण बाळ हा आदर्श पुत्र ठरायचा. आज मात्र समाजव्यवस्थेत अमुलाग्र बदल झालेले आहेत. आधुनिकीकरण व जागतिकीकरण यामुळे सामाजिक निती, मूल्यांची घसरण होत आहे. आई वडीलांना संभाळायला कोणीही तयार नाहीत. सुशिक्षित व श्रीमंत मुले ही कुटूंबातील वृध्दांची हेळसांड करतांना दिसत आहे.

वृध्द ही एक अशी संकल्पना आहे की, ज्या मध्ये व्यक्ती सरासरी आयुर्मानापर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक जीवन जगत आहे. जगातील सर्वच व्यक्तींचे सरासरी आयुर्मान हे समान असू शकत नाही. कारण आहार विहार, स्थळ, वैद्यकीय सेवांची उपलब्धता यासर्व बार्बीमुळे वेगवेगळया देशातील लोकांचे आयुर्मान वेगवेगळे आहेत. भारतातील १९९९ च्या वृध्दांच्या राष्ट्रीय धोरणा नुसार भारतातील सरासरी वय हे ६० ठरवण्यात आलेले आलेले आहेत. आलिकडच्या काळात त्यात वाढ होउन ते ६४ पर्यत झालेले आहे.

**भारतातील वृध्दाचे प्रमाण**

| स्त्रोत | महिला | पुरूष | शहर | ग्रामीण | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| जनगणना-१९८१ | ६.६ | ६.४ | ६.८ | ५.४ | ६.५ |
| जनगणना-१९९१ | ६.८ | ६.७ | ७.१ | ५.१ | ६.८ |
| जनगणना-२००१ | ७.८ | ७.१ | ७.७ | ६.७ | ७.४ |
| NSSO Survey २००७-२००८ | ७.७ | ७.३ | ७.६ | ७.२ | ७.५ |

(Sourse:Situation of analysis of elderly in India)

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, भारतामध्ये दिवसेंन दिवस वृध्दांच्या संख्यामध्ये वाढ होत आहे. भारतामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार वृध्दांची संख्या ७.४% एवढी आहे. त्यामध्ये पुरषांचे प्रमाण हे ७.१% तर स्त्रीयांचे प्रमाण ७.८% आहे. तर NSSO च्या २००७-०८ च्या अहवालानुसार भारतामध्ये वृध्दांचे प्रमाण ७.५% असून शहरात वृध्दाचे प्रमाण ७.६% तर ग्रामीण समुदायात ७.२% आहे. ६६ ते ६४ वयोगटातील वृध्दांचा मृत्युदर २० ( दर हजारी ) आहे, ७५-८९ वयोगटातील ८० तर, ८५ पेक्षाअधिक वयातील वृध्दाचा मृत्युदर हा २०० आहे.

**वृध्दांच्या प्रमुख समस्या :-**

**१. कुटूंबापासून दूरावा :-** आजच्या चंगळवादी व भौतिकवादी समाजव्यवस्थेत माता पित्याचा आदर सन्मान व त्यांच्याप्रती आसलेले कर्तव्य नवीन पिढी विसरत चाललेली आहे. अनेक तरुण आई वडीलांना सोडून शहरकडे राहतांना दिसतात. आज तर अनेक परदेशात शिकणारे युवक आपल्या माता पित्यांच्या अंत्यसंस्कारालाही येत नसल्याचे दिसते.ज्या आई वडीलांनी आयुष्याभर कष्ट करून शिकवल मोठ केले व नोकरीला लावलं तीच मुले वृध्दकाळात आई वडीलांना सोडून जातात. त्यामुळे उतरत्या वयात वृध्द आपल्या कुटूंबा पासून तुटतात व एकाकी जीवन जगताना दिसून येत आहे.

Situation of Analysis of Elderly in India(२०११) च्या अहवाला नुसार ७५% पुरूष व ४०% स्त्रीया हया त्यांच्या जोडीदारा सोबत राहतात तर २०% पुरूष व ५०% महिला त्याच्या मुलांसोबत राहतांना. यावरून असे दिसून येते की, बहूतांश वृध्द त्याच्या मुलांपासून वेगळे राहतात.

**२. आर्थिक परावलंबन :-** एका विशिष्ट वयापर्यंत व्यक्ती काम किंवा कष्ट करू शकते व पैसा कमवू शकते. त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत असतो, परंतु वय वाढल्यानंतर व्यक्तींना कष्टाचे कामे करता येत नाही व ते आपला उदरनिर्वाहासाठी दुसऱ्यावर आवलंबुन राहतात. पेशन धारक वृध्द सोडल्यास सर्व वृध्द दुसऱ्यांवर परावलंबी बनतात.

**वृध्दांचे परावलंबत्व दर्शवणार तक्ता (आकडेवारी % मध्ये)**

| विभाग | परावलंबन नाही | काही प्रमाणात परावलंन | पुर्णतः परावलंबन |
|---|---|---|---|
| ग्रामीण पुरूष | ५१ | १५ | ३२ |
| ग्रामीण स्त्रीया | १४ | १२ | ७२ |
| ग्रामीण व्यक्ती | ३३ | १४ | ५२ |
| शहरी पुरूष | ५६ | १३ | ३० |
| शहरी स्त्रीया | १७ | १० | ७२ |
| शहरी व्यक्ती | ३६ | ११ | ५२ |

Sources: NSSO २००४

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ५२% वृध्द हे आर्थिक दृष्टीने परावलंबी आहेत, तर ७२% स्त्रीया हया परावलंबी आहेत. म्हणजेच परावलंबनाचे प्रमाण स्त्रीयांमध्ये जास्त आहेत. Situation of Analysis of Elderly in India(२०११) नुसार, आर्थिकदृष्टया परावलंबन असलेल्या पुरूषवृध्दांना ६-७% जोडीदारांकडून, ८५% मुलांकडून, २% नातवंडाकडून व ६% इतर व्यक्तींकडून आर्थिक मदत होते. तर स्त्रीवृध्दांना १६% जोडीदारांकडून, ७५% मुलांकडून, ३% नातवंडाकडून व ६% इतर व्यक्तींकडून आर्थिक मदत होते.

**३. शारीरिक व आरोग्य विषयक समस्या :** वृध्दपणामध्ये शारिरिक व आरोग्य विषयक समस्या हया सर्रास दिसून येतात.

वेगवेगळया आजाराने शरीर खंगुन जाते. आजच्या पिढी कडुन योग्य सेवा सुश्रुशा केली जात नसल्याने वृध्दांना जीवन नकोसे होते. ग्रामीण भागातील ५५% वृध्दामध्ये तर शहरी भागातील ६३% वृध्दामध्ये शारीरिक व आरोग्य विषयक समस्या दिसून येतात.

**४. अकार्यक्षमता :** (Disability) शारीरिक व आरोग्य विषयक समस्यांमुळे अनेक व्याधी वृध्दामध्ये निर्माण होतात. त्यामध्ये प्रामुख्याने १,००००० वृध्दांमागे १८० मेंटल रोगी आढळून येतात, तर १७३३ ग्रामीण व १०८१ शहरी वृध्दांना अंधळेपणा आलेला आहे, १५५१ ग्रामीण तर १३८५ शहरी वृध्दांना ऐकू येत नाही, १९० वृध्दांना बोलता येत नाही. २७९६ वृध्दांना अपंगत्व आलेले आहेत. यावरुन वृध्दांच्या समस्येचे दु:ख आपल्या लक्षात येउ शकते.

**५. भावनात्मक दुरावा :** समाजातील वृध्द व्यक्ती म्हणजे अडगळी पडलेली व्यक्ती होय. काम नसल्यामुळे त्यांना दिवसभरघरात बसून रहावे लागते त्यातच त्याचे आजारपण व त्यांची होणारी कुचुंबना यामुळे ते भावनिकदृष्टया खुपच खचून जातात त्यांना भावनिक आधार दयायलाही कोणाला वेळ नसतो. अनेक कुटुंबामध्ये तर आईला एक मुलगा संभाळतो तर वडीलाला दुसरा मुलगा त्यामुळे दोन जोडीदारांची तुटातुट होते व ते भावनिक दृष्टया पार दुखावले जातात. ते केवळ शरीरारे जीवत व भावनेने मृत झालेले शरीर असतात.

**वृध्दाच्या समस्यांची प्रमुख कारणे :**

१. सामाजिक नितीमुल्यांची घसरण
२. भौतिकवाद व चंगळवादी संस्कृती
३. औदयोगीकरण
४. नागरीकरण
५. कौटूबिक संस्काराचा अभाव
६. वाढते आयुर्मान



Scanned with CamScanner

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

November 2020 Special Issue- 29 Vol. I

# Human Rights

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Shaurya Publication, Latur**



Scanned with CamScanner

105.व्यक्तीचे मानवी हक्क आणि शासनाची भूमिका,धोरण 285

प्रा.डॉ.शंकर गड्डमवार

106.मानवी हक्क आणि महिला विकास 288

प्रा. डॉ. सोनटक्के जी. एन.

107.मानवअधिकारवसामाजिकदृष्टीकोन 291

प्रा.राहुल सोनवणे

108. मानवाधिकारांचे आंतरराष्ट्रीयकरण आणि राष्ट्रीय सार्व भौमत्व 293

डॉ.एल.बी.धुमरे

109. स्त्रीयांच्या सबलीकरणात मानवी हक्कांचे योगदान : एक अभ्यास 296

प्रा.डॉ.प्रकाश फड

110. मानवी हक्क व महिला विकास 299

डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव

111. बालहक्क व मानव अधिकार 302

गणेश तुकाराम मोकासरे

112. मानवी हक्क आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना 305

डॉ. सुधीर आश्रुबा येवले

113.जागतिकीकरणाचे मानवी हक्कावरील परिणाम 309

प्रा. एस.बी.कर्डक, डॉ. बी.एस.पवार

114.मानवाधिकार और महिलाऐँ 314

डॉ.पुरुषोत्तम भ. मनगटे

115. आदिवासी साहित्यातील मानवाधिकार आणि मूल्य 317

प्रा. अशोक शिलांबरराव खेत्री

116. मानवी हक्क आणि शाश्वत विकासाचे घटक व तत्वे 319

प्रा.डॉ.सुधाकर एस.हांगे

117. मानवी हक्क आणि नक्षलवाद्यांची सशस्त्र चळवळ एक अभ्यास 321

डॉ. प्रकाश जाधव

118.संघर्ष कहानी संग्रह में अभिव्यक्त समस्याएं 324

प्रा. डॉ. वंदन बापूराव जाधव

119.हिंदी साहित्य और मीडियां 326

डॉ. गोविंद सोनाजीराव पांडव

120.मानवी हक्क आणि भारतातील कामगारांचे कायदे 330

प्रा डॉ. दीपक एम. भारती



Scanned with CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 29 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
November 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# बालहक्क व मानव अधिकार

**गणेश तुकाराम मोकासरे**
समाजशास्त्र विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

---

मानव हा एक समाजशील प्राणी आहे. त्याला जन्मत: निसर्गाने सर्व अधिकार दिलेले असतात. त्याला आपण नैसर्गिक अधिकार म्हणतो. परंतु मानव हा स्वार्थी प्रवृत्तीचा असल्याने त्याने एकदुसऱ्याच्या अधिकारावर अतिक्रमण केले व कमजोर वर्गाचे हक्क व अधिकार हिसकावून घेतल्यामुळे ते त्याच्या मुलभूत अधिकारापासून वंचित राहीले. त्यांचे शोषण होत राहीले. हळूहळू औद्योगिक क्रांती, शैक्षणिक प्रगती यामुळे आपले अधिकार व हक्क याबद्दल लोकांमध्ये जाणिव जागृती निर्माण झाली.

मानव अधिकाराचा विचार किंवा संकल्पना ही दुसऱ्या महायुध्दानंतर मोठयाप्रमाणात अधिक प्रभावीपणे मांडली गेली. 1946 ला United Nations Commissions on Human Rights (UNCHR) ची स्थापना करण्यात आली. 2006 ला त्याचे United Nations Human Rights Councils मध्ये रुपांतर केले. भारतामध्येही National Human Rights Commission ची स्थापना 1993 ला झाली. जगातील विविध वंचीत किंवा बळी पडलेल्या लोकांना त्याचे मानव अधिकार मिळवून देणे. तसेच शासनाच्या योजनांचे मूल्यमापन करून सर्वांना त्याच्या अधिकारांचा जतन होते की नाही हे तपासणे इ. महत्वपुर्ण उद्दिष्ट मानव अधिकाराचे आहेत.

**उदेदश:**

1. बालकांचे मानव अधिकार जाणून घेणे.
2. भारतातील बालकांच्या हक्कांकडे होणारे दुर्लक्ष स्पष्ट करणे.

**अध्ययन पध्दती:**

सदरील पेपर तयार करतांना व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला असून, विविध संदर्भ ग्रंथ् व शासकीय अहवाल या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**गृहितकृत्य:**

भारतामध्ये बालहक्कांची पायमल्ली मोठयाप्रमाणत होते.

**मानव अधिकाराचा अर्थ:**

मानव अधिकार हे मुलभूत अधिकार असून, मानवा-मानवांमध्ये राष्ट्रीयता, धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, याआधारावर कोणताही भेदभाव मान्य नाही. प्रत्येक व्यक्तीला तीचे स्वातंत्र व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न केला जातो.

**हेरॉल्ड लास्की:**

'मानव अधिकार सामाजिक जीवनातील अशी स्थीती आहेत, ज्याशीवाय सामान्य व्यक्ती पुर्ण आत्म विकासाची आशा करू शकत नाही.'

**वाइल्ड:**

'काही विशेष कार्य करण्याची स्वातंत्रता आणि विवेकपुर्ण मागणीच्या अधिकारला मानाव अधिकार म्हणतात.'

**बालक व मानव अधिकार:**

Universal Declaration of Human Rights 1948 नुसार प्रत्येक व्यक्ती हा जन्मानेच स्वतंत्र, आणि त्याला समान प्रतिष्ठा व समान अधिकार असतात. बालक जन्मत: एक निष्पाप जीव असतो. त्याचा शारीरिक, बौध्दीक, मानसिक विकास झालेला नसतो. मानव अधिकारानुसार त्याला ते सर्व अधिकार मिळायला पाहिजे ते सर्व अधिकार एक व्यक्तीला एक मानुस म्हणून मिळालेले असतात. परंतु दुर्दैवाने असे होत नाही. भारतामध्ये तर मोठया प्रमाणात बालकांना त्यांच्या हक्कापासून वंचीत ठेवले जाते व त्यांच्यावर अन्याय केला जातो.

CRC (THE CONVENTION ON THE RIGHT OF THE CHILDREN) ने बालकांसदर्भात 04 मुलभूत तत्वे सांगीतलेली आहेत. ते पुढील प्रमाणे.

1. भेदभाव न करणे
2. मुलांची आवड
3. जगण्याचा अधिकार, विकास
4. मुलांचे दृष्टीकोन/मत

भारताच्या संदर्भात जर वरील तत्वाच्या साहयाने बालकांच्या हक्कांचा आढावा घ्यावयाचा झाल्यास असे दिसून येईल की, भारतात लोंकामध्ये बालकांच्या अधिकारांबदृल खुपच उदासिनता आहे. येथे जन्मत:च मुलगा व मुलींमध्ये भेदभाव केला जातो. त्यामुळेच भारतात स्त्रीपुरष दर हा कमी आहे. 2011 च्या जनगनणेमध्ये दर 1000 पुरषांमागे केवळ 940 च स्त्रीया आहेत. दमण आणि व्दिप मध्ये तर



Scanned with CamScanner

618,दादर नगर हवेली- 775, चंदिगड-818, दिल्ली -866 असा लिंगप्रमाण आहे. यावरूण हेच स्पष्ट होते की, भारतामध्ये बालकांमध्ये लिंगाच्या आधारावर मोठयाप्रमाणावर भेदभाव केला जातो.

सामाजिकरण ही एक महत्वाची प्रकीया आहे. जिच्या माध्यामातून व्यक्ती जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली सर्व नियमणे व मूल्य शिकून घेत असतो. परंतु भारतात मात्र संस्काराच्या नावाखाली मुलांनी काय घालावे काय घालु नये, काय खावे काय खाउ नये याची बंधने लादली जातात. शिक्षण घेतांना काय शिकावे अथवा काय शिकू नये याची जबरदस्ती केली जाते. इच्छा नसतांना मुलांना इंग्रजी शाळेत पाठवले जाते. त्याच्या पाठीवर त्याला न सोसनारे दप्तराचे ओझे असते, खेळण्याच्या वयात त्याला 2-3 टयुशन असतात. त्याचा खेळण्याचा हसण्याचा सर्व अधिकार आई-वडील हिरावून घेत आहे. इच्छा नसतांना किंवा आवड नसतांना ही मुलांना डॉक्टर, इंजिनियर यापरीक्षेची तयारी करावी लागते व यात अनेक विद्यार्थी अपयशी होतात व आत्महत्या सुध्दा करतात. ही सुध्दा त्याच्या अधिकारावर आई वडीलांनी आणलेली गदा असते.

Children in India -2018 च्या अहवालानुसार 2015-16 मध्ये 81% मुलीच दहाव्या वर्गापर्यंत शिक्षण घेतात. 56% मुलींच 12 व्या वर्गापर्यंत पोहचतात. Pratham Annual Survey of Education Report नुसार भारतात 18 वर्षापर्यंतच्या 32% मुली व 18% मुलांचा शाळेत प्रवेशच झालेला नसतो. आर. टी. ई. नुसार भारतात आठवीपर्यंत मुलांना मोफत शिक्षण मिळायला पाहिजे. परंतु आजही अनेक वाडी वस्त्या व आदिवासी मध्ये शिक्षणाची दुरास्था झालेली दिसते

जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाला जगण्याचा अधिकार आहे. परंतु भारतात मात्र पाच वर्षाच्या आतील 8,82,000 मुलांचा 2018 मध्ये मृत्यु झाला, असे UNICEFE च्या State of the World`s Children 2019 अहवालात म्हणटले आहे. भारतामध्ये कुपोषणाची समस्या सुध्दा मोठयाप्रमाणावर आहेत. प्रत्येक बालकाला सकस आहार मिळावा हा त्याचा अधिकार आहे. परंतु भारतात बालकामधील कुपोषणाचे प्रमण हे 40% पर्यंत आहेत. भारतातील आई वडील केवळ मुलांना जन्म देण्याचे काम करतात. त्याच्या आहार व आरोग्याकडे पुर्णत: दुर्लक्ष करतात याचेच हे लक्षण आहे. काही पाश्चात्य राष्ट्रांमध्ये मुले ही राष्ट्राची आधार स्त्ंभ मानली जातात व शासन त्याच्या जन्मापासून ते वयाच्या अठरा वर्षापर्यंत त्याचे आरोग्यवीमा पॉलीसी काढतात. भारताता वीमा तर सोडाच पण आपल्याकडे तर अनेक मुले प्राथमिक स्वरूपाच्या लसीकरण न झाल्यामुळेही मरतात.

प्रत्येक बालकाचे संरक्षण व विकास हे शासणाचे व त्या समाजाचे कर्तव्य आसते. परंतु भारतीय बालकांच्या संदर्भात अपहरण ही एक गंभीर समस्या बनली आहे. National Crime Record Bureau नुसार भारतात दर 08 मिनीटाला 01 बालक गायब होते. यामुलानां परप्रातात नेउन त्याच्याकडून भिक मागवून घेतली जाते. अनेक बालीकांना वेश्या व्यवसायामध्ये विक्री केली जाते. National Crime Record Bureau 2018 नुसार भारतात दररोज 109 children sexual abuse च्या घटना घडताता हे किती भयावह आहे. यांचे अधिकार तर सोडाच त्यांना नरक यातना सहन करत जगणे आहे.

**बालकामगार**

ज्या वयामध्ये मुलांनी खेळावे, बागडावे, हसत खेळत शिक्षण घ्यावे त्यावयात भारतामध्ये अनेक मुले हे विटभट्टी, कारखाना, असंघटीत क्षेत्र इ. ठिकाणी राबतांना, काम करतांना दिसतात. 2011 च्या जनगनणे नुसार भारतामध्ये 10.1 दशलक्ष बालकामगार आहेत. त्यापैकी 5.6 दशलक्ष हे मुले असून 4.5 दशलक्ष मुली आहेत. त्यात ॅअनेक मुलं फटाक्याच्या कारखान्यात आग लागुन मरतात, तर काही कारखान्यात अपघातामुळे जखमी होतात.

प्रत्येक व्यक्ती हा आजुबाजूच्या परीस्थीतीचा देण असते. कळत नकळत त्याच्यावर सामाजिक परीस्थीतीचा प्रभाव पडत असतो. भारतात सुध्दा आई-वडीलांचे दुर्लक्ष, आजुबाजूची वाईट परीस्थीती यामुळे मुलांवर वाईट संस्कार होतात व ते गुन्हीगारीकडे वळतात. 2018 च्या National Crime Record Bureau नुसार भारतात 31531 बालगुन्हयाची नोंद 2018 मध्ये झाली होती. यावरून भारतातील बालगुन्हीगारी गंभीरता दिसून येते.

**सारांश**

प्रत्येक बालकाला या पृथ्वी तलावार जगण्याचा आनंद घेण्याचा अधिकार आहे. एक मानव म्हणून त्यालाही त्याच्या सर्व अधिकार उपभोगण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये स्वतंत्र, प्रतिष्ठा, शिक्षण, त्याचे मत, भावना, आवडी निवडी याबाबींना महत्वाचे स्थान आहे. परंतु भारतात बालकांकडे एक माणुस म्हणून बघण्याची मानसिकता अजून पुर्णत: तयार झालेली नाही. सामाजिकरण होतांना त्याच्या आवडी निवडीला किंवा मताला कोणतेच स्थान नसते. मोफत शिक्षणाच अधिकार असूनही आजही अनेक बालके प्राथमिक शिक्षणापासून वंचीत आहेत. अनेक मुले कारखान्यात, विटभट्टीवर बालकामगार म्हणून राबत आहेत, आरोग्याच्या पुर्ण सुविधा बालंकांना मिळत नाहीत. अनेक बालके कुपोषनाने मरत आहेत. ही विदारक स्थिती बदलून बालकांना त्यांचा सन्मान व प्रतिष्ठा मिळायला पाहिजे. अन्यथाही उमललेली फुल कोमजुन जातील.

शासनाचे बालकांना संरक्षण देणारे अनेक कायदे आहेत जसे की, आर. टी. ई., ज्युव्हेनाइल जस्टीस एक्ट, बालकामगार प्रतिबंध कायदा, Protection of Child From Sexual Abuse, Sex Determination act, इ. परंतु यासर्व कायदयांची प्रत्याक्षात व्यवस्थित



Scanned with CamScanner

अंमलबजावणी व्हायला पाहिजे, जनमानसांत बालकांच्या हक्कांबद्दल जनजागृती व्हायला हवी. कठोर शिक्षीचे तरतुद असावी, बालविकास मंत्रालयाने केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता प्रत्यक्ष फिल्ड वर्क वर भर दयावा, तरच खऱ्या अर्थाने भारतात बालकांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाही.

**संदर्भ:**

आहूजा राम, 2010, सामाजिक अनुसंधान, रावत पब्लीकेशन, जयपूर
National Crime Bureau Report- Crime in India-2018.
कुलकर्णी पी.के., मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लीकेशन, पुणे 2013.
भारंबे नंदकुमार, 2012, मानवी हक्क, निराली प्रकाशन, पुणे.
Human Development Report-2019 UNDP
Children in India Report 2018
Indian Census Report-2011




Scanned with CamScanner

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE
## IV JAN. 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | मराठी नाटकाचे बदलते तंत्र | डॉ.विकास बापूराव बहुले | 113-119 |
| 27 | 'समकालीन मराठी दलित कथेतील विद्रोही" | प्रा. युवराज धबडगे | 120-122 |
| 28 | दत्ता भगत यांच्या नाटकातील भाषिक परिवर्तन : एक अभ्यास | प्रा. डॉ. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | 123-125 |
| 29 | मराठी दलित साहित्याची सामाजिक भूमिका | प्रा.नवाजी गेंदलाल घरत | 126-129 |
| 30 | पाऊस पाणी : ओल्याचिंब अनुभवाचा थेट आविष्कार | प्रा.रेखा व्ही.इंगोले | 130-134 |
| 31 | व्यवहारभाषेतील आधुनिकीकरण | डॉ.प्रतीक्षा गायकवाड | 135-138 |
| 32 | 'शबरी" कादंबरीची नायिका : शबरी | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष | 139-144 |
| 33 | महात्मा फुले : विचार आणि कार्य | प्रा.डॉ.संजय मारोतराव देबडे | 145-149 |
| 34 | गावठाण : एक आकलन | डॉ.वैशाली भालसिंग | 150-157 |
| 35 | विभावरी शिरुरकर यांच्या "उमा" कादंबरीची नायिका | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष | 158-165 |
| 36 | समकालीन हिंदी उपन्यास और दलित जीवन | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 166-170 |
| 37 | व्याकरण का उद्‌भव तथा महत्व | शिंदे प्रशांत हाबु | 171-175 |
| 38 | वर्तमान मानव जीवन में मूल्य शिक्षा की भूमिका | डॉ. विलास तुकाराम राठोड़ | 176-181 |
| 39 | सकारात्मकतेचे ऊर्जाकेंद्र-मंदिर | प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे | 182-186 |
| 40 | शेतकऱ्यांचे हित जोपासणारे शिवराय | डॉ. संजय गोपालराव ठवळे | 187-190 |
| 41 | भारतीय संस्थानाचे भारतात विलीनीकरणाची भुमीका | प्रा. डॉ. शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 191-193 |
| 42 | २१व्या शतकातील संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे | डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे | 194-197 |
| 43 | धर्मांतरण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. तळणीकर एस. जी. | 198-200 |
| 44 | भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हाने | डॉ.आण्णासाहेब हारदारे | 201-204 |
| 45 | वैदुसमाजाची राजकीय वाटचाल | श्री.अशोक चंदर शिंदे | 205-210 |
| 46 | चार्लस हर्टन कुले यांची प्राथमिक गटातीला कुटुंबाची संकल्पना आणि एकविसाव्या शतकातील कुटुंबाची सदयस्थिती | डॉ. संजय सुरेवाड | 211-215 |
| 47 | भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरांतील असमतोल : स्वरुप, कारणे, उपाय | प्रा.भांडवलकर बी.एन. | 216-218 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिविषयक विचार | प्रा.डॉ. गणेश तुकाराम मोकासरे | 219-222 |
| 49 | वातावरणाच्या रचनेचा एक भौगोलिक अभ्यास | डॉ. बोबडे बबन्न बाबुराव | 223-227 |
| 50 | नैसर्गिक आपत्ती : सामाजिक परिणाम व व्यवस्थापन | प्रा. डॉ चंद्रकांत वामनराव गजेवाड | 228-231 |
| 51 | शरीर धारणेवर परिणामकरणारे घटक | प्रा. हेमंत त्रिंबकराव शिंदे | 232-233 |
| 52 | ख्याल गीतप्रकाराच्या विषयांतून घडणारे भारतीय संस्कृतीच्या विविधतेचे दर्शन | प्रा.डॉ.रवींद्र रामभाऊ इंगळे | 234-236 |
| 53 | महाराष्ट्र राजयामध्ये पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे व्यावस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. घोडके जे.व्ही | 237-239 |
| 54 | शालापुर्व बालकांच्या कुपोषणाचा अभ्यास व उपाय | संशोधक : वर्षा अंकुश दाभाडे | 240-242 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिविषयक विचार

**प्रा.डॉ. गणेश तुकाराम मोकासरे,**
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
सुंदरराव सोळंकें महाविद्यालय, माजलगाव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महान सामाजिक, राजकीय, आर्थिक विचारवंत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भरतीय समाजव्यवस्थेचे सर्वांगीण दृष्टीकोनातून अध्ययन करून भारतातील जाती, अस्पश्यता, धर्म याबाबत आपले विचार मांडलेले आहेत. असे असले तरी भरतीय समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्याकडे पुणर्तः दुर्लक्ष केल्याचे दिसते. १९१६ मध्ये त्यांनी डॉ.ए.ए. गोल्डनवायझर मानवविज्ञान परीषदेत भाग घेवून भारतातील जातीची घडण, उत्पती आणि विकास हा संशोधनपर पेपर सादर केला होता. हाच पेपर पुढे १९१७ मध्ये प्रकाशीत झाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे WHO WERE SHUDRAS, THE UNTOUCHABLES, ANNIHILATION OF CASTE, THE BUDDHA AND HIS DHAMMA, REVOLUTION AND COUNTER REVOLUTIONIN ANCIENT INDIA, THOUGHTS ON PAKISTAN इ.लिखाण हे अत्यंत शास्त्रीय व संशेधनपर लिखाण असून ,त्यामुळे ते एक महान समाजशास्त्रज्ञ व सामाजिक विचारवेत ठरतात.

जाती व्यवस्था हे भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्टये आहे. जातीव्यवस्थेने भारतीय समाजात स्तरीकरण निर्माण झालेले आहेत. स्पृश्य अस्पृश्या सारख्या अनिष्ठ प्रथा सुरु झाल्यात. काही जातींना समाजात विशिष्ट व उच्च स्थान निर्माण झालेले आहेत, तर काही जातींना कनिष्ट स्थान निर्माण झालेले आहेत. आजही भारतीय समाजात जातीचा प्रभाव मोठयाप्रमाणात अस्तीत्वात असलेला दिसतो. हजारों वर्षांपूर्वी जाती निर्मान होउन त्यांचा विकास भारतात झालेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाती व्यवस्थेमुळे अनेक ठिकाणी अपमान सहन करावा लागला. त्यांनी अत्यंत तार्कीक दृष्टीकोनातून भारतीय जातीची उत्पत्ती व जाती निमूर्लनासंदर्भात आपले विचार मांडलेले आहेत.

**उद्येश:**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती विषयक विचारांची मांडणी करणे.

**गृहितकृत्य:**

१. गटाअंतर्गत विवाहाची बंधने लादल्यामुळे जातीची निर्मीती झालेली आहे.

**तथ्य संकलन:**

सदरील पेपर तयार करतांना व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला. विविध संदर्भ ग्रंथ स्त्रोत म्हणून वापरण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ANNIHILATION OF CASTE, या ग्रंथात भारतातील जातींच्या उच्चाटना सदंर्भात आपले विचार मांडलेले आहेत. त्याच्यामते भारतातील काही सुधारक हे राजकीय सुधारणांना

अधिक महत्व देतात, तर समाजवादी हे आर्थिक सुधारणांना महत्व देतात. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक सुधारणा केल्याशिवाय ( जातीचा राक्षस मारल्याशीवाय ) राजकीय व आर्थिक सुधारणा होउ शकत नाही. भारतातील अनेक जात समर्थक हे जातीला श्रम विभाजनाचे नाव देतात व त्याला गैरमानत नाही. ते श्रमीकांचे विभाजन नव्हे, तर त्यामध्ये श्रमीकांच्या विभाजनाची एकावर एक श्रेणी लावण्यात आली असून, ती वंशपरंपरागत आहे. हे विभाजन नैसर्गिक सुध्दा नाही. भारतात व्यवसायात योग्य ते बदल करण्यास परवानगी न दिल्याने भारतातील बेकारीचे जात हे एक महत्वाचे कारण ठरते.

भारतात काही जात समर्थक जातीला जीवाशास्त्राचा आधार देतात. वंशवृध्दी, रक्तशुध्दीसाठी ते आवश्यक मानतात. मात्र आंबेडकर मानववंशास्त्रज्ञंचा आधर देवून सांगतात की, भरतात एकही जात व वंश आज शुध्द स्वरूपात आढळत नाही. जितक्या जाती तितके वेगळे वंश असे म्हणणे हे वस्तुस्थीचा विपर्यास करण्यासारखे आहे. पंजाबचा ब्राम्हण व मद्रासी ब्राम्हण यांच्यात कोण्ताही वांशिक साम्य नाही. तर पंजाब मधील ब्राम्हण व चांभार यांच्यात कोण्ताच वांशिक भेद नाहीत. जातीने आर्थिक प्रगती किंवा वांशिक शुध्दता होत नाही. उलट तिने हिंदूना पूर्णपणे विघटीत केले व अनैतिक बनविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती उपत्पती संबधी आपले विवेचन भारतातील जाती त्याची घडण, उत्पत्ती व विकास या त्यांच्या निंबधात केलेले आहे. सदरील निबंध त्यानी १९१३ साली कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्राच्या अभ्यास मंडळासमोर वाचला होता. यात त्यांनी काही विचारवंतानी जातीच्या केलेल्या व्यांख्यांचे खंडन करुन, जाती उत्पत्ती भारतात कशी झाली हे स्पष्ट केलेले आहे. त्याच्यामते जाती बाहय विवाहाची उणीव - जातीअंतर्गत विवाह हाच खराखुरा जातीचा आत्मा आहे. त्यांच्यामते जात्यंतर्गत विवाह हेच जातीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. थोडक्यात गटाअंतर्गतविवाह करणाऱ्या रुढीने स्वगटाबाहेर लग्न करण्याच्या रुढीवर मिळवलेला विजय म्हणजे जातीची निर्मीती होय.

बाबासाहेबांच्या मते प्राचीन भारतात गट बाहय विवाहाची पध्दती सर्रास चालू होती. काळाच्या ओघाबरोबर गटबाहय विवाहाची रुढी मागे पडली आणि केवळ रक्ताचे नातेवाईक वगळल्यास आज लगनाच्या क्षेत्रात कोणतेही सामाजिक बंधन उरले नाही. डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात आता जाती कशा निर्माण झाल्या? याप्रश्नाचे उत्तर देतांना ते म्हणतात, गटबाहय विवाह पध्दतीच्या रुढीचा विरोध पचवून स्वगटात विवाह करण्याची प्रथा ज्या साधनांनी टिकवून ठेवण्यात आली हे जर आपण समजू शकलो तर आपल्याला या प्रश्नाचे उत्तर मिळेल.

बाबासाहेबांच्यामते कोणत्याही समाजात साधारणतः स्त्री-पुरुषाची संख्या सारखीच असते. गटाअंतर्गत विवाह पध्दती टिकवून ठेवायची असेल, तर लोकांचे लग्नविषयक हक्क व गरजा गटातल्या गटात पुर्ण करता आल्या पाहिजे. नाहितर गटातील लोक आपल्या गरजा हव्या तशा पुर्ण करतील व बाहयगटाशी संबध साधतील. म्हणुन गटाअंतर्गत विवाह करण्यासाठी लोकांच्या विवाह विषयक गरजा हया गटातच पुर्ण



Scanned with CamScanner

होणे गरजेचे आहे. त्यासाठी गटातील स्त्रीपुरूष संख्याही सारखीच असने गरजेचे आहे. जर स्त्री पुरुषातील तफावत आटोक्याबाहेर गेली तर ही पध्दत निश्चित पणाने मोडून पडल्याशीवाय राहणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारतीय समाजात स्त्री पुरुषातील तफावत आटोक्यात आणण्यासाठी काही प्रथा जाणिव पूर्वक तयार करण्यात आल्या.

१. सती किंवा विधवेला मृत पतीच्या चितेवर जाळणे. ज्यामुळे पती निधनानंतर अतिरीक्त ठरलेल्या स्त्रीयांचा प्रश्न मार्गी लागेल.

२. विधवेला पुनर्विवाहाची बंदी घालून तिच्यावर वैधव्याची सक्ती घालणे. सती या कठोर मार्गाला सौम्य पर्याय

३. बाल विवाह (अल्पवयीन मुलीचे लग्न) -ज्या पुरुषांच्या पत्नीचे निधन झालेले आहेत त्यासाठी पर्याय. पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे व नियम बनवणार पुरूषच असल्याने, विधुरांसाठी सौम्य पर्याय किंवा त्यांना संन्यास घेण्याची सक्ती करणे.

बाबासाहेबांच्यामते, जात हा एक स्वयंमर्यादित वर्ग आहे. जाती प्रथेची वाढ व प्रसार भारतात कसा झाला या प्रश्नाचे उत्तरादाखल ते म्हतात की, जगातील इतर समाजाप्रमाणे भारतीय समाजही सुरवातीच्या काळात अनेक वर्गांनी मिळुन बनलेला होता. १. ब्राम्हण २. क्षैत्रिय किंवा सैनिक वर्ग ३. वैश्य किंवा व्यापारी वर्ग ४. शुद्र किंवा शेतकरी व मजुराचा वर्ग. या पध्दतीत व्यक्तीला पात्रता मिळवल्या नंतर त्याला वर्ग बदलता येत होते. मात्र हिंदुच्या इतिहास काळात केव्हातरी उपाध्याय वर्गाने सामाजिक संबधाच्या बाबतीत बाकीच्या जनतेपासून स्वतःला वेगळे तोडून घेतले. त्यामुळे श्रम विभाजनाच्या तत्वानुसार बाकीच्या जनतेचीही विभागणी झाली. यामुळे काही वर्ग खुपच माठे तर काही वर्ग खुपच लहान झाले. सैनिकी पेशा स्वभावतःअशा पोटविभागणीस अनुकूल नसल्यामुळे क्षत्रिय वर्गाचे विभाजन राज्यकर्ते व सैनिक अशा दोनच वर्गामध्ये झाले. वैश्य आणि शुद्रात जातीच्या मुळ रुपाचा बराच मसाला भरलेला होता. त्यामुळे आपल्या अनेक जातीच्या उगमाचा हा वर्ग मुळ साठा ठरला. एका समाजाचे अशा तऱ्हेने पोटविभाग पाडण्याची प्रक्रीया पुर्णतः स्वाभाविक आहे. परंतु या पोटविभागासंबधी अस्वाभाविक गोष्ट म्हणजे त्यांनी वर्ग पध्दतीतीली मुक्तप्रवेश पध्दती गमावली आणि ते स्वयंमर्यादित वर्ग बनले. त्यांनाच जाती असे म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे आपल्या विवेचनात असे स्पष्ट करतात की, या विभाजीत वर्गाना प्रवेश बंद करुन अंतर्गत विवाह करण्यास कोणी भाग पाडले, की त्यानी स्व ईच्छेने आपली व्दारे बंद केलीत? हा प्रश्न महत्वाचा आहे. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात काहींनी स्वतः व्दारे बंद केली तर इतरांना त्याच्यांसाठी असलेली व्दारे बंद असल्याचे आढळुन आले. ब्राम्हणांनी सर्वप्रथम आपल्यावर्गाचे व्दार बंद केले व अंतर्गत विवाहाचे नियम लावले. ब्राम्हण हा वर्ग समाजातील श्रेष्ट वर्ग असलयाने किंबहुना त्यांना देवच मानल्या जात असल्यामुळे इतरांनीही त्यांचे डोळे झाकपणे अनुकरण केले. पुढे हे वर्ग सुध्दा अंतर्गत विवाह पाळणाऱ्या



Scanned with CamScanner

जातीत रुपांतरीत झाले. येथे बाबासाहेबांनी अनुकराच्या सिध्दांताचे उदाहरण देवून हे पटवून दिलेले आहे. एका वर्गाने स्वत:बंदिस्त करुन घेतल्या मुळे दुसरा वर्गही आपोआप बंदिस्त झाला व जातीअंतर्गत विवाहाचे नियम पाळू लागला त्यातून अनेक जाती निर्माण होत गेल्या.(भाजा३२)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या ANNIHILATION OF CASTE या ग्रंथात म्हणतात, जातीचे भारतीय समाजातून उच्चाटन करण्यासाठी, सहभोजन, सभा आयोजन करून जात नष्ट होणार नाही तर तीचे मुळ हे जातीअंतर्गत विवाहात आहे. म्हणून आंतरजातीय विवाह हा जाती उच्चाटनाचा एकमेव मार्ग आहे. जो पर्यंत रक्ताची सरमिसळ होत नाही तोपर्यंत जात संपुष्टात येणार नाही.

**सारांशः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च बौध्दिक प्रगल्भता असलेले सामाजिक विचारवंत होते. त्यांनी भारतीय समाजाचा अत्यंत सुक्ष्म, शास्त्रीय व वस्तुनिष्ट पध्दती अभ्यास केलेला आहे. जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे मुलभूत वैशिष्ट असून, त्यामुळे भारतीय समाजात जातीनिहाय स्तरीकरण झालेले आहे. जातीअंतर्गत विवाह हाच खराखुरा जातीचा आत्मा आहे.जात्यंतर्गत विवाह हेच जातीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,गटाअंतर्गत विवाह टिकवून ठेवण्यासाठी एकाच गटातील स्त्रीपुरष संख्या समान राहणे गरजेचे होते. म्हणून भारतीय समाजात स्त्री पुरुषातील तफावत आटोक्यात आणण्यासाठी काही प्रथा जाणिव पूर्वक तयार करण्यात आल्या.त्यात सतीप्रथा, विधवा पुर्नविवाहास बंदी, बालविवाह इ. आपल्या विवेचनात पुढे जावून ते म्हणतात भारतात प्राचीन काळी चार वर्ग होते. ते म्हणजे बाम्हण, क्षत्रिय,वैश्य, व शुद्र हे होय. परंतु पुढील काळात ब्राम्हण वर्गाने स्वतःला बंधीस्त करुन घेतले गटाअंतर्गत विवाहाचे नियम लावून घेतले. ब्राम्हण हा समाजातील श्रेष्ट मानला जाणारा वर्ग असल्यामुळे त्यांचे अनुकरण इतर वर्गाने केले किंबहुना एका वर्गाने स्वतःला बंदिस्त केल्याने दुसऱ्या वर्गासाठी त्याचे व्दार आपोआप बंद होते. त्यामुळे दुसरा वर्गही आपोआप बंदिस्त झाला व अंतर्गटविवाहाचे नियम पाळु लागला. यातूनच अनेक जाती निर्माण झाल्या. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारतातील जाती नष्ट करायच्या असतील तर आंतरजातीय विवाह हेच जाती अंताचे एकमेव साधन आहे. रक्ताची सरमिसळ झाल्याशीवाय जाती अंत होणार नाही.

**संदर्भः**


१. डॉ. आंबेडकर बी. आर., भारतातील जाती (घडण, उत्पत्ती आणि प्रसार), अनु-गांजरे मा.फ., अशोक प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. आंबेडकर बी. आर., (२०१२) जातीप्रथेचे निर्मूलन, अनु,-प्रबुध्द प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. बगाडे उमेश, (२०१९), डॉ. आंबेडकरांची जातीमीमांसा, लोकवाङमय गृह, मुंबई.


◆◆◆



Scanned with CamScanner

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol.I, Issue-XLVI, January 2022

Editor : Mrs. Pallavi Laxman Shete

## Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with CamScanner

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor 2022: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

**Vol. I ISSUE - XLVI Year – 7 Jan. 2022**

**Editor in Chief**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)

Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director**

**Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,

Taroda (KH), Nanded – 431605

(India -Maharashtra)

**Email:** Shrishprakashan2009@gmil.com

umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067



Scanned with CamScanner

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# कोविड 19 आणि भारतातील मजुरांच्या स्थलांतराचे प्रश्न

प्रा. आर. बी. काळे
समाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

गणेश तुकाराम मोकासरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना:**

स्थलांतरही मानवाची मूलतः एक प्रवृत्ती आहे. प्राचीन काळापासून मानव कोणत्या ना कोणत्या कारणामुळे स्थलांतर करीत आलेला आहे. अन्न- पाणी व शिकारीसाठी आदिमानवाने विविध ठिकाणी स्थलांतर केलेले आहे. आजच्या आधुनिक काळामध्ये सुद्धा मानव रोजगार, व्यवसाय, शिक्षण इत्यादी कारणासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करताना दिसतो. त्यामुळे स्थलांतर ही प्रक्रिया प्राचीन काळापासून ते आजपर्यंत चालू आहे. स्थलांतरामध्ये आंतरराष्ट्रीय स्थलांतर, राष्ट्रीय स्थलांतर व राज्यांतर्गत स्थलांतर हे प्रकार आहे. राज्यांतर्गत स्थलांतरमध्ये ग्रामीण भागाकडून नगराकडे होणारे स्थलांतर, नगरातून ग्रामीण भागात होणारे स्थलांतर,नगरातून नगराकडे होणारे स्थलांतर व ग्रामीण भागातून ग्रामीण भागाकडे होणारे स्थलांतर हे प्रकार पडतात. covid-19 च्या काळात नगरातून ग्रामीण भागाकडे होणारे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले. याशिवाय अंतरराष्ट्रीय स्थलांतराची संख्या सुद्धा मोठी होती.

**उद्देश :**

कोविड च्या काळात मजुरांचे झालेले स्थलांतर व त्यांच्या समस्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने टाळेबंदी काळातील विविध न्यूज, इंटरनेट, वर्तमानपत्रे इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**कोविड 19 आणि भारतातील मजुरांच्या स्थलांतराचे प्रश्न :**

स्थलांतराची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीच्या स्वरूपाची आहे. स्थलांतराचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. त्यासाठी स्थलांतराची प्रवृत्ती, स्थलांतराचा उद्देश, स्थलांतराच्या वेळची स्थिती, स्थलांतराचा कालावधी, स्थलांतराचे अंतर इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. केनेथ कोमेयर यांच्या मते, "एका भौगोलिक किंवा राजकीय प्रदेशातून दुसऱ्या भौगोलिक किंवा राजकीय भूप्रदेशात दीर्घकालीन वास्तव्याच्या उद्देशाने जाणाऱ्या व्यक्ती किंवा गटाच्या क्रियेस स्थलांतर असे संबोधले आहे."

देशांतर्गत स्थलांतर हे देशांतर्गतच एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होत असते. या स्थलांतरासाठी सर्वसामान्यतः आर्थिक, सामाजिक, धार्मिक कारणे कारणीभूत असतात. देशांतर्गत स्थलांतराचे दोन प्रकार पडतात. आंतरराज्य स्थलांतर व राज्य- अंतर्गत स्थलांतर, आंतरराज्य स्थलांतर या स्थलांतरात लोक एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वास्तव्यासाठी जातात. या स्थलांतरितात स्थलांतर करून घेण्याची प्रवृत्ती मुख्यतः नोकरी-व्यवसाय यांची संधी यामुळे निर्माण होत असते, परंतु भारतामध्ये कोवीड महामारीमुळे जी परिस्थिती निर्माण झाली, त्यामुळे भारतात देशांतर्गत स्थलांतरास गती प्राप्त झाली. याचे कारण म्हणजे टाळेबंद झाल्यामुळे मजूर वर्गांना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे तसेच नोकरीच्या संधी नसल्यामुळे अशा प्रकारचे स्थलांतर भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात झालेले आपल्याला दिसून येते.

Covid-19 च्या काळामध्ये समाजामध्ये अनेक प्रश्न उभे राहिले. त्यापैकी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मजुरांचे स्थलांतर. भारतातील 2011 च्या जनगणनेनुसार जवळपास भारतीय लोकसंख्येच्या 37 टक्के स्थलांतरित कामगार आढळतात. नॅशनल सॅम्पल सर्व्हे नुसार, एकुण कामगारांपैकी 38.3 टक्के स्थलांतरित कामगार आहे. भारतामध्ये 100 दशलक्ष च्या जवळपास अंतर्गत स्थलांतरित आढळून येतात. भारतामध्ये कोरोनाचा प्रसार मार्च 2020 पासून मोठ्या प्रमाणात व्हायला



Scanned with CamScanner

सुरुवात झाली. त्यामुळे मार्च पासून भारतात पहिला टाळेबंद झाल्यामुळे सर्वात जास्त गंभीर प्रश्न निर्माण झाला, तो असंघटित कामगारांचा. असंघटित कामगारांचे संपूर्ण कारखाने बंद झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचा मार्ग पण बंद झाला. त्यामुळे त्यांचे निवास भाडे सुद्धा त्यांना देणे अवघड झाले होते. त्यामुळे त्यांना गावाकडे जाण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. परंतु टाळेबंदी लागल्यामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्था बंद असल्यामुळे शेकडो-हजारो किलोमीटर दूरचा प्रवास करणेही शक्य नव्हते. त्यामुळे मुंबई, कलकत्ता, दिल्ली, हैदराबाद या ठिकाणी या शहरांमध्ये मजुरांचे जत्थेच्या जत्थे रेल्वे स्टेशन व बस स्टैंड वर गोळा होत होते. परंतु पोलिसांच्या दबावामुळे त्यांना घरी परत जावे लागत असे. या सर्व परिस्थितीमुळे आणि कामगारांनी आपल्या गावाकडे पायी जाण्याचा मार्ग निवडला. आर्थिक टंचाई, अन्नधान्याचा तुटवडा व हजारो किलोमीटरचा पायी प्रवास यामुळे मजुरांचे अत्यंत दयनीय अवस्था झाली होती.

Covid-19 च्या काळात मजुरांच्या स्थलांतर करीत असताना अनेक कामगार मृत्युमुखी पडले, परंतु आज सुद्धा शासनाकडे याची अधिकृत नोंद नाही. आज अनाधिकृत आकडेवारीनुसार असे मानले जाते की, या स्थलांतराच्या काळात भारतात 971 कामगारांचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्रातील औरंगाबाद ची घटनासुध्दा मन हेलावून टाकणारी होती. औरंगाबादजवळ रेल्वे मालवाहतूक गाडीने 16 मजुरांना चिरडून टाकले, जे आपल्या गावी परत निघाले होते. रस्त्यात थकवा आल्यामुळे रेल्वे रुळावर झोपी गेले होते. अशा विविध घटना या काळात भारतात घडल्या.

**समस्या :**

टाळेबंदीची सर्वाधिक झळ कामगारांवर बसलेली दिसून येते. कंत्राटी, दैनंदिन मंजूर असलेल्या, हातावर पोट असलेल्या, छोट्या स्वयम् व्यवसाय करणाऱ्या कामगारांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागले. वेतन बंद, वेतन कपात, नोकरी जाणे अशा समस्याही अनेकांच्या वाट्याला आल्या. कोरोना संसर्गाची भीती, आर्थिक समस्या, मानसिक तनाव यातून स्थलांतरित श्रमिक यापैकी बहुतांशी लोकांनी आपल्या मूळ गावी परतण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या स्थलांतरास आपण या ठिकाणी उलट स्थलांतर असे म्हणू शकतो. मूळ गावी या कुटुंबाची कोणी सदस्य किंवा नातेवाईक आहेत किंवा घर आहे असे लोक पुन्हा त्यांच्या मूळ गावी आलेले दिसतात.

लॉकडाऊन दरम्यानच्या काळात श्रमिकांना अनेकविध समस्यांना सामोरे जावे लागले. वेतनावरच कुटुंब अवलंबून असल्याने दैनंदिन जीवनात अडचणी आलेल्या दिसतात. कामगारांचे उत्पन्न हळूहळू कमी होत गेल्याचे आढळून आले. लॉकडाऊनच्या काळात कुटुंबाच्या एकुण कमाईतून कुटुंबाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी आल्या. तसेच खाण्यापिण्याच्या वस्तू मिळवण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी आल्या. कामगारांना पैशाची अधिक प्रमाणात अडचण आल्याचे समोर आले. टाळेबंदीच्या काळात कामगारांना राज्यांतर्गत गावी जाण्याची सुविधा उपलब्ध नव्हती. एस.टी. महामंडळाची वाहतूक बंद असल्याकारणाने कामगारांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागला. त्यासाठी त्यांना अधिकचे पैसेही मोजावे लागले. अनेक कामगार हे दुधाच्या, पाण्याच्या किंवा रॉकेलच्या रिकाम्या टँकरमध्ये जीवघेणा प्रवास करत होते. सेव लाईफ फाउंडेशनच्या मते, याकाळात 1200 अक्सीडेंटमध्ये 381 लोक मृत्युमुखी पडले त्यात 30 टक्के हे स्थलांतरीत मजुर होते, जे गावाकडे परत जात होते.

इंडिया टुडे च्या वृत्तानुसार वाहतूक सुविधा नसल्याने भारतातील मजूर शेकडो किलोमीटर आपल्या गावी पायी जात होते. त्यामध्ये काही वृद्ध, काही स्त्रिया काही गरोदर स्त्रिया व सर्व बालके सुद्धा होती. त्यात काहींनी आपला गाव येण्याअगोदरच जीव गमवावा लागला. अशा अनेक घटना या काळात भारतात घडल्याचे आपल्याला दिसून येते. स्थलांतरित मजुराच्या अनेक प्रश्न पैकी एक महत्वाचा प्रश्न होता तो म्हणजे अन्न-पाणी. हजारो लाखो प्रवासी अन्नपाण्याशिवाय आपल्या गावी प्रवास करत होती. रस्त्यात ज्या ठिकाणी खायला मिळेल किंवा प्यायला पाणी मिळेल त्या ठिकाणी ती आपली भूक व तहान भागून पुढे निघत होते. परंतु अनेक शासकीय मदत केंद्रामध्ये अन्नधान्याचा तुटवडा होता. काही ठिकाणी पाण्याची



Scanned with CamScanner

जाणवा होती. शासनाच्या सुविधा अपुऱ्या पडत होत्या, त्यामुळे या काळात कामगारांची उपासमार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

स्थलांतरित मजुरांचे प्रश्न इथेच थांबत नाही तर स्थलांतरण अनेक वाईट अनुभव आलेले दिसतात. त्यामध्ये सामाजिक संबंधातील दुरावा, धार्मिक कलह, नात्यातील दुरावा असे अनेक प्रश्न निर्माण झाले. शहराकडून निघालेले मजूर आपल्या गावाकडे प्रवास करत होते, तेव्हा काहींना एखादया शहर किंवा तालुक्याच्या ठिकाणी थांबून अडवले गेले व जबरदस्तीने क्वारंटाईन करण्यात आले. या संदर्भात औरंगाबाद येथील घटना चर्चित राहिली, कारण तेथे अनेक मजुरांना शाळेत जबरदस्तीने क्वारंटाईन करून ठेवले होते. त्यांना वेळेवर अन्न व पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी होत्या. स्थलांतरित कामगार जेव्हा आपल्या गावी पोहोचत होते, तस-तसे त्यांना वाईट अनुभव येत होते. कोरोना संसर्गाच्या भीतीने शहरातून अत्यंत दूरवरचा प्रवास करून सुद्धा गावात पोहोचून त्यांना शांतता, प्रेम व आपुलकी मिळत नव्हती. असाच एका गावात मजुरांचा समूह गावात पोहचल्यावर त्यांच्यावर रासायनिक पाण्याचा (सॅनिटायझरचा) फवारा मारण्यात आला हे सर्व जगाने टि. व्ही. च्या माध्यमातून बघीतले आहे. त्या समूहातसुध्दा लहान बालके व वृध्दांचा समावेश होता. अशा अनेक प्रकारच्या समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत होते.

**सारांश :**

वरील विवेचनावरून हे दिसून येते की, भारतामध्ये असंघटित कामगारांची संख्या जास्त आहे. कामगारांचे अनेक प्रश्न कोरोना काळात समोर आले. यामध्ये कामगारांच्या सोयी-सुविधांचा अभाव त्यांची संघटना नोंदणी याबाबतीत भारतात मोठ्या प्रमाणात अनभिज्ञता दिसून येते. covid-19 मुळे स्थलांतरित कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले, त्यामध्ये प्रामुख्याने वाहतूक व्यवस्थेचा अभाव, अन्नधान्य पुरवठा अभाव, शासनाचे कामगाराकडे असलेले दुर्लक्ष हे प्रमुख प्रश्न होते.


**संदर्भ:**


1. htttps://kartavysadhna.in
2. https://theuniqueacademy.co.in
3. 27 july 2020 Dainik lokmamat newspaper
4. https://pmj.bmj.com/content/97/1149/471


Scanned with CamScanner

ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-15

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

Scanned with CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.15 May-June-2022

CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | Domination Of Gender For Pleasurable Career<br>**Dr Tejas R Sharma** | 1-4 |
| 2 | Depiction Of Indian Culture & Society In The Graphic Novels<br>**Dr. Arya D. W, Miss Kendre S. A** | 5-8 |
| 3 | Chimamanda Ngozi Adichie's Idea Of Feminism & Her Depiction Of Women In Her Literary Works<br>**Dr. Arya D. W, Miss Kendre S. A** | 9-11 |
| 4 | Gender Asymmetry In India's Foreign Policy Decision Making<br>**Vishakha Jha** | 12-16 |
| 5 | The Sri Lankan Identity Related With The Concept Of God Skandha Kumara<br>**Dr. Amila Damayanthi** | 17-21 |
| 6 | Women Empowerment: A Study Of Jaishree Misra's Ancient Promises<br>**Mr. Gajanan Telang, Dr.Vaishali Aher** | 22-24 |
| 7 | Gender And Education In India<br>**Mr. Sushilkumar Sadashiv Raut** | 25-26 |
| 8 | Lgbt And Human Rights<br>**Nita Changdeo Deshbhratar, Kanchan Babarao Jambhulakr** | 27-32 |
| 9 | Aspects Of Gender Negotiation And Feminism In The Works Of Jeanette Winterson<br>**Pouria Mallahi** | 33-34 |
| 10 | Gender Wise Impact Of Pandemic On Informal Sector Study Among Women Domestic Workers In Pune<br>**Dr. Narshing Giri, Mrs. Umrao Sayyad , Mr. Rushikesh Hiwale** | 35-38 |
| 11 | Violation of Dalits Human Rights and Gender Equality in India and its Remedies<br>**Dr Chitade Nandkishor Pandurang** | 39-42 |
| 12 | Recent Trends Of Poverty In India<br>**Dr. Nasiket Govindrao Suryavanshi** | 43-48 |
| 13 | Agricultural Labourers Problems And Remedies In India<br>**Dr. Maneesh. B** | 49-51 |
| 14 | Gender And Health<br>**Gadekar pandurang Chandrakant** | 52-53 |
| 15 | लिंगभाव विषमता आणि बंजारा समाजातील स्त्रिया<br>**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड** | 54-56 |
| 16 | लिंगभाव आणि भारतीय महिलांची आर्थिक स्थिती<br>**गोविंद द. बावस्कर** | 57-59 |
| 17 | कृषीच्या विकासात स्त्रियांची भूमिका<br>**प्रा .डॉ. दीपक एम .भारती ,गोविंद रामराव काळे** | 60-62 |
| 18 | स्त्री-पुरुष वेतन अंतर<br>**प्रोफेसर दीपक एम. भारती, साखरे ज्योती जालिंदर** | 63-64 |
| 19 | लिंगभाव आणि समाजीकरण<br>**डॉ. गणेश तुकाराम मोकासरे** | 65-67 |
| 20 | लैंगिक समाजीकरण और भारतीय समाज : एक समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य<br>**Dr. Usha Kiran Tiwari** | 68-70 |
| 21 | नैतिकता के दुष्टचक्र में बेहाल नारी<br>**डॉ. अरविंद अंबादास घोडके** | 71-73 |
| 22 | जागतिक लिंग असमानता<br>**प्रोफेसर दिपक .एम . भारती, मैंद आनंद श्रीकृष्ण** | 74-76 |
| 23 | परिवार मे लिंग और लैंगिक असमानता विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. गजानन खंडू सोनुने , डॉ. जयसिंग पोपटसिंग सिंगल** | 77-80 |




Scanned with CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.15 May-June-2022

# लिंगभाव आणि समाजीकरण

**डॉ. गणेश तुकाराम मोकासरे**
समाजशास्त्र विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
Email- gtmokasare@gmail.com

**गोषवारा(Abstract) :**

लिंगभाव ही एक सामाजिक व सांस्कृतिक संकल्पना आहे. जीच्याव्दारे स्त्री-पुरषातील भेदभाव निर्देशीत होतो. तर समाजीकरण एक शिकण्याची प्रक्रीया आहे. ज्यामध्ये व्यक्ती सामाजिक जीवन जगण्याचे नियमणे व मूल्ये शिकत असतो. मानवी मूल जन्माला येते त्या वेळी ते एक प्राणी म्हणून जन्माला येते. त्याच्या काही गरजा, भावाना असतात. मानव जातीचा सदस्य म्हणून अनुवंशाने प्राप्त झालेली काही जैविक वैशिष्टयेही त्याला लाभलेली असतात. त्यामुळेच त्याचे समाजीकरण घडून येते. समाजीकरणामुळे व्यक्ती जैविक प्राण्यातून सामाजिक प्राण्यात रुपांतरीत होतो.

**प्रस्तावना:**

पुरषी वर्चस्वामुळे किंवा पुरूषप्रधान संस्कृतीमुळे भारतीय समाजातील व्यक्तीचे समाजिकरण हे पुरषाला अधिक महत्व देणारे तर, मुलीला कमी महत्व देणारे ठरते. लिंगभाव संकल्पनेतही याचाचा अभ्यास होतो की, स्त्री पुरूषात सामाजिक व सांस्कतीक भेदभाव कसा केला जातो व तो समाजिकरणामुळे कसा दृढ होत जातो. सदरील पेपरमध्ये समाजीकरणामुळे एक व्यक्ती स्त्री किंवा पुरूष कशाप्रकारे बनत जातो याचा अढावा घेण्यात आलेला आहे.

**उद्येश:**

1. सामाजिकरण व लिंगभाव या संकल्पना जाणून घेणे.
2. सामाजिकरण व लिंगभाव या संकल्पनेतील परस्पर संबध जाणूण घेणे.

**अध्ययन पध्दती :**

सदरील पेपर तयार करतांना व्दितीय तथ्य संकलन पध्दतीच्या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. तसेच वर्णनात्मक स्वरुपात विषयाचे विश्लेषन करण्यात आले आहे. लिंगभाव सामाजीकरण ही एक व्यकतीची शिकण्याची प्रक्रीया आहे, ज्यामध्ये व्यक्ती आपल्या लिंगानुसार समाजाला अपेक्षित असलेले वर्तन करत असतो. यालाच जेंडर रोल असेही म्हणतात. **Simone De Bouvier** यांच्यामते, **'One is not born, but rather becomes, a woman'** स्त्री ही जन्माना येत नसते तर, तीला स्त्री बनवले जाते. भारतात पुरुष प्रधान संसकृतीमुळे, स्त्रीला दुय्यम वागणुक मिळते. हुंडा पध्दत, वंशाचा दिवा, परक्याचे धन यासर्व नकारात्मक मानसिकतेमुळे सर्वत्र स्त्रीही नकोशी झालेली आहे. त्यामुळे स्त्रीभ्रुण हत्या भारतात मोठया प्रमाणात होतात. म्हणजे स्त्री ही जन्मालाच नको, अशी मानसिकता कुटंबात असते. त्यामुळे कुटूंबातील लहान मुले व मुली याच्यामनावार त्या गोष्टी बिंबवल्या जातात व त्यामुळे त्याचे सामाजिकरण ही त्याच प्रमाणे होत जाते.

जन्मानंतर लगेच कुटूंबाकडून किंवा समाजाकडून मुलांवर लिंगभावात्मक संस्कार बिंबवायला सुरवात होते. भारतासारख्या देशात मुलगा झाला की, आनंद साजरा केला जातो तर, मुलगी झाली की शोक व्यक्त केला जातो. कुटुबात मुलगी जन्माला आली की, तीचे कान टोचले जातात, नाक टोचले जाते, तिला कपडे ही मुलींप्रमाणे घातली जाते. त्यामुळे एक व्यक्ती म्हणून जन्माला आलेली ती मुलगी आपण घरातील मुलापेक्षा काही तरी वेगळे आहोत, असे समजु लागते व त्यानुसार वर्तन करायला लागते. मुलाने शुरवीर, कर्तबगार असावे असे शिकतले जाते. तर मुलींनी प्रेमळे, लाजाळु असावे असे सांगीतले जाते. त्यामुळी मुलीही तशाचा बनत जातात. मुलींच्या शरीरात असे काहीच नसते, ज्यामुळे ती मुलासारखे कपडे घालु शकत नाही किंवा बाईक चालवु शकत नाही. मुलींनी बाहुलीशी खेळावे, तर मुलाने बॅट व बॉल खेळावा असे शिकवले जाते. पण मुलाने जर बाहुलीशी खेळले तर काहीच बिघडत नाही. तेही बाहुलीशी खेळु शकतात. पण तसे केल्यास



Scanned with CamScanner

मुलाना बायल्या म्हणून हिणवले जाते. त्यामुळे त्याला बाहुली आवडत असली, तरी तो तीच्याशी खेळत नाही. स्वयंपाक करणे अपत्यांना जन्माला घालणे, मुलांचे संगोपन करणे हे मुलींनी किंवा स्त्रीयांनीच करावे, असे काही नैसर्गीक नियम नाहीत. पण कुटूंबात मात्र आजही स्वयंपाक केवळ स्त्रीलाच करावा लागतो. त्यामुळे स्त्री ही सुगरण असली पाहीजे असे शिकवले जाते किंबहूना सुगरण हा तीचा एक दागिणाच आहे असे संबोधिले जाते. याउलट आज जर आपण पाहीले तर पुरुषही चांगल्या प्रकारे स्वयंपाक करु शकतात. कारण आज अनेक उच्च दर्जाच्या हॉटेलमध्ये कुक हे पुरुषच आहेत. कुटूंबात मात्र आजही पुरुपाने स्वयंपाक करणे बाईलपणाचे लक्षण मानले जाते. घरात जेवण करतांना पुरपांनी आगोदर जेवायचे नंतर उरलेला व थंड झालेला स्वयंपाक स्त्रीयांनी किंवा मुलींनी खावा असेच नियम आहेत. आत्तापर्यंच्या अभ्यासक्रमाच्या चित्रांमध्येही मुलगीही आईला स्वयंपाक घरात मदत करतांना दाखवली जात होती. तर मुलगा वडीला जवळ पेपर वाचतांना किंवा खेळताना दाखवला जात होता. यासारख्या समाजिकरणामुळे मुलींच्या भूमिका मुलांच्या भूमिका व कार्यक्षेत्र वेगळे होत जाते व त्यांच्यात भेदभाव वाढत जातो.

मुले शाळात जायायला लागली की, तेथेही भेदभाव होतो. श्रिमंत, नोकरदार, साक्षर लोक सुध्दा आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिकवतात. तर मुलींना मात्र मराठी साध्या शाळेत टाकतात. त्यामुळेही मुलींच्या मनात दुय्यम भाव निर्माण होतो व मुले म्हणजे श्रेष्ठ व मुली म्हणजे कनिष्ट अशी भावना होते. मासिकपाळी ही नैसर्गीक बाब आहे. पण तीला अपवित्र मानून काही दिवस बाजूला बसवले जाते, याउलट मात्र मुलांना असे काहीच नियम नसतात. मुलीवर अत्याचार झाला किंवा बलात्कार झाला की, तीचे चारीत्र खराब झाले असा ठपका ठेवला जातो, तर ज्या मुलाने अत्याचार केला त्याला मात्र असे काहीही नियम नसतात. त्याचे चारीत्र खराब होत नाही. म्हणजेच बलात्कार हा असा गुन्हा आहे, जीच्यावर अन्याय झाला तीलाच दोषी मानले जाते. तीच्याशी कोणी लग्न करायला तयार नसते निट बोलत नाही इत्यादी. अशा चुकीच्या सामाजिकरणमुळे स्त्रीला स्वत: बद्यल घृणा निर्माण होते.

भारतासारख्या पितृसत्ताक देशात वारसा हक्क हा मुलांनाच दिला जातो. मुलगीही परक्याचे धन म्हणून ओळखले जाते. त्यामुळे शेतीची मालकी, घराची मालकी ही मुलाच्याच नावाने केली जाते. त्यामुळे मुली हया आर्थिक दृष्टीने असुरक्षीत बनतात. त्यांचे बहुतांश कामे सुध्दा गैरमौद्रिक असतात. घरात पाहुणे आले तर मुलींनी समोर येवू नये, त्यांच्याशी बोलु नये. हे सर्व सुसंस्कृतपणाचे मानले जाते. पण यामुळे मुलीची गळचेपी होते, तीचा व्यक्तीमत्व विकास निट होत नाही. हे कोणी लक्षातच घेत नाही. पाश्च्यात्य देशातील “Personal is Politics” या म्हणीमुळे महिलांचे राजकीय अलिप्तता व शोषण बाहेर आले. भारतासारख्या देशातही राजकारण हे फक्त पुरषाचे क्षेत्र आहे अशी मानसिकता आहे. एवढेच नव्हेतर कुटूंबात तसे स्त्रीच्या मनावर बिंबवले जाते. म्हणजेच तसे समाजीकरण जाणिवपूर्वक केले जाते. यामुळेच महिलांची संख्या संसदेत नगन्य असते. 2019 च्या निवडणुकीत हा आकडा थोडा वाढून 76 वर गेला. मात्र आजही स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला नावापरुत्याच पदावर असतात. त्याचे पतीच सगळे कामे पहातात. हे आता 21 व्या शतकात अपेक्षित नाही. याबाबी बदलणे गरजेचे आहे.

**सारांश:**

प्रत्येक समाजात नर व मादिला हळूहळू स्त्री व पुरुषात रुपांतरीत केले जाते. स्त्रीत्व व पुरुषत्व ( बाईपण व पुरुषपण ) हया वेगळया भमिका, वेगळे गुण, हक्क, जबाबदाऱ्या, अपेक्षा व वर्तनप्रकार यातून घडवले जाते. म्हणजेच समाजीकरणामुळे या सर्व बाबी घडून येतात. लैंगिक (जैविक) फरक सोडल्यास स्त्री पुरुषात दुसरा कोणताही भेद नाही. मग आपणास स्त्री व पुरषात भेदभाव करण्याचा अधिकार काय? यासर्वास जबाबदार आहेत चुकीचे समा[illegible] महिलांचे शोषण होते व त्यांना समाजात दुय्यम दर्जा प्राप्त होतो. याउलट मुलाना व मुलींना नैसगिकरीत्या त्यांच्या आवडीने वाढू दिले तर त्याचा विकास शध्दस्वरुपात होईल व महिलाही पुरुपांच्या गुलामीतून मुक्त होतील.

70 / 117





Scanned with CamScanner

**संदर्भ ग्रंथ:**

1. विकास का समाजशास्त्र, शिवबहाल सिंह, रावत पब्लीकेशन, जयपूर. 2010
2. लिंगभाव समजून घेतांना, कमला भसीन, अनु. श्रुती तांबे. लोकवाङ:मय गृह, पुणे.2010
3. सामाजिक अनुसंधान, दोषी व जैन, रावत पब्लीकेशन, जयपूर. 2010
4. मुलभूत समाजशास्त्रीय संकल्पना, डॉं. सर्जेराव साळुखे, नरेंद्र प्रकाशन , पुणे. 1996
5. विकास का समाजशास्त्र वाणी प्रकाशन, दिल्ली.1996



Scanned with CamScanner

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol.I, Issue-LXVIII, 1 October 2022



# Thoughts and Works of Indian Social Reformers

## भारतीय समाजसुधारकांचे विचार व कार्य



Editor in Chief
Dr. Ramkishan N. Dahiphale

**Quarterly Research Journal**

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor:* 7 . 479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

**Vol. I ISSUE - LXVIII Year – 8 01 Oct. 2022**

**Janata Shikshan Prasarak Mandal's**

## MAHILA KALA MAHAVIDYALAY, AURANGABAD

**(Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University, Mumbai)**

**Organized One Day Interdisciplinary National Conference**

**on**

# Thoughts and Works of Indian Social Reformers

**:: Editor in Chief ::**

**Dr. Ramkishan N. Dahiphale**

Principal

Mahila Kala Mahavidyalay, Aurangabad

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com / umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No: +91-9623979067**



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 34. | संत नामदेवजी का समाजसुधार | प्रा. तुकाराम पाराजी गावंडे | 128 |
| 35. | लोकराजा : छत्रपती शाहू महाराज | प्रा. डॉ. संजय राजधर महाले | 131 |
| 36. | महात्मा ज्योतीराव फुले यांचे शेतीविषयक विचार | डॉ. नरसिंग भानुदास देशमुख | 136 |
| 37. | शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन | डॉ. गणेश तुकाराम मोकासरे | 139 |
| 38. | महात्मा फुले यांचे लेखन आणि कार्य | जितेंद्र बाबुराव शेजवळ | 142 |
| 39. | डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य | डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | 145 |
| 40. | संत साहित्यातील सुधारणावादी विचार | प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी | 148 |
| 41. | महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शैक्षणिक कार्य | प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा | 151 |
| 42. | भारताच्या विकासात महिला समाजसुधारकांची भूमिका व कार्य : | प्रा. डॉ. रेणुका दशरथराव बडवणे (भावसार) | 154 |
| 43. | "शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे हत्यार आहे" – डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. डॉ. तुकाराम त्र्यंबक कोल्हे | 157 |
| 44. | अंधश्रध्दा निर्मूलनात स्वामी विवेकानंद यांचे योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. मुंडे रामकिशन हरिदास | 161 |
| 45. | सावित्रीबाई फुले यांची कविता | श्रीमती राधिका बनकर | 164 |
| 46. | महिला विकासात डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे योगदान | प्रा. डॉ. मीना बोर्डे- सूर्यवंशी | 168 |
| 47. | समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकरांचे मराठी साहित्याला योगदान | डॉ. बालाजी डिगोळे | 171 |
| 48. | समाजसुधारकांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य | डॉ. रा. ज. चाटे | 175 |
| 49. | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. प्रा. चंद्रसेन सावळाराम आवारे | 180 |
| 50. | संत गाडगेबाबा यांचे सुधारणावादी विचार व कार्य | डॉ. अर्चना सं. काटकर | 184 |
| 51. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे एक पाऊल | प्रा. नामदेव रखमाजी खर्जुले | 187 |
| 52. | स्त्री उद्धारासाठी समाजसुधारकांचे योगदान | डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे | 190 |
| 53. | समाजसुधारकांचे मराठी साहित्याला योगदान | अस्मिता वि. वांद्रे. | 194 |
| 54. | राजर्षी शाहू महाराज यांचे समाज सुधारणा व शिक्षण विषयक विचार व कार्य | निखिल गणेश जगताप<br>डॉ. बेलखेडे एम. बी. | 199 |




Scanned with OKEN Scanner

# शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन

डॉ. गणेश तुकाराम मोकासरे
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड.-431112
gtmokasare@gmail.com Mob: 9923344975

**प्रस्तावना:**

प्राचीन काळामध्ये भारतात मोठयाप्रमाणत जातीयता दिसून येत होती, त्यामुळे अस्पृशतेविषयक अनेक नियम समाजात निर्माण झाले होते.वर्ण व्यवस्था व जातीव्यवस्थेने समाजात विषमतेची उतरंड तयार झाली होती.उच्चजाती व उच्चवर्णीयांकडून कनिष्ठांचे शोषण मोठयाप्रमाणावर होत होते.जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये त्यांना निर्बंध लादल्यामुळे दलीतांची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती.परंतु ब्रिटीशांनी भारतामध्ये कारकुन निर्मीती साठी का होइना शिक्षणाची सुरवात केली.त्यामुळे येथिल सर्वसामान्य वर्ग शिक्षण घेउ लागला व त्याच्या उन्नतीची दारे उघडायला सुरवात झाली.त्याला त्याच्या अधिकाराची व कर्तव्याची हळूहळू जाणीव निर्माण झाली.

महाराष्ट्रामध्ये महात्मा जोतीबाफुले, राजर्षी शाहू महाराज व बासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी आपले संपर्ण जीवन दलीतोध्दारासाठी व अस्पृश्यता निवारसाठी खर्च केले. सदरील पेपरमध्ये राजर्षी शाहू महाराजयांच्या अस्पृश्यता निर्मूलन विषयक कार्याचा आढावा घेण्याचा प्रर्यत्न केलेला आहे.

**उद्येश:**

1. शाहूमहाराजांचे अस्पृश्यता निवारण विषयक कार्याचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती:**

सदरील पेपर तयार करतांना विविध संदर्भीय ग्रंथाचा वापर करण्यात आला व वर्णनात्मक स्वरुपात आशयाचे विश्लेशन करण्यात आले आहे.

शाहूमहाराजांचे अस्पृश्यता निवारण विषयक महत्वाचे पाउल म्हणजे 1902 मध्ये त्यांनी आपल्या संस्थानामध्ये सुरु केलेले आरक्षण होय. त्यांनी एक जाहीरनामा प्रसिध्द करुन मागासलेल्या लोकांसाठी कोल्हापूर संस्थानात शेकडा पन्नास जागा राखीव ठेवल्या होत्या.याशीवाय दुसरे महत्वाचे कार्य म्हणजे गंगाराम कांबळे यादलीताला हॉटेल काढण्यास केलेली मदत. केवळ मदतच केली नाही तर महाराज स्वत: या हॉटेलमध्ये येउन चहा पिउन जात होते. यावरुण शाहू महाराज हे केवळ बोलके समाजसुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते हे दिसून येते.

राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्या समाजाच्या शिक्षणासाठी खास आदेश दिलेले होते."1906 च्या आदेशानुसार कोल्हापूरात चांभार, महार अशा अस्पृश्य लोकांसाठी एक रात्रीची शाळा सुरू केलेली होती.28 नोव्हें.1906 च्या आदेशाने, महाराजांनी ती शाळा कायम केली होती. 1907 ला महाराजांनी अस्पृश्य समाजातील चांभार, ढोर या अस्पृश्य समाजातील मुलींच्या शिक्षणास मंजुरी देउन शाळेसाठी दरसाल 96 रुपये खर्चाचीही मुजूरी दिली होती. पुढे 1906 रोजी भास्करराव जाधव यात्यांच्या मित्राच्या साहयाने अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करुन दिली होती. 1991 आदेशानुसार महाराजांनी संस्थसानातील अस्पृश्य लोकांसाठी मोफत शिक्षण सुरू करुन,त्यांच्या हुशार विद्यार्थ्यांनसाठी शिष्यवृत्तीची सुरवात केली.28 सप्टें.

1919 रोजी त्यांनी एक आदेश काढून अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून, त्यांना सरकारी शाळेत इत
मुलांबरोबर कुठलाही भेदभाव न करता शिकण्यात यावे अशी सूचना केली."

शाहू महाराजांची भूमिका ही मानवतावादी भूमिका होती. 1918 ला त्यांनी एक आदेश क
पध्दतीचे निर्मूलन केले. हा आदेश कोल्हापूर गॅझेटमध्ये ऑगस्ट 1918 रोजी प्रसिध्द झाला.या आदे
वाबींचा उल्लेख करण्यात आला होता, "इलाखे मजकुरी गुन्हेगार जातींच्या लोकांची हजेरी दररो
पाटलाकडे होते. त्यातील काही जातींची हजेरी माफ केली असून, काही काही ठिकाणी त्यांची हजेरी घ्य
येते.या हजेरीपासून त्या त्या जातींच्या लोकांची फार गैरसोय होते व इमानाचे धंदे करून पोट भरण्या
पडते, ही सर्व अडचण दूर झाली पाहिजे. यासाठी हुकूम देण्यात येतो की, महार, मांग, रामोशी व बेरड
जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी.यातील जे कुणी गुन्हात सापडून शिक्षा झालेले असतील त्य
या हुकूमाने हजेरीची माफी नाही."

वेठबिगारीमुळे सामान्यजनतेचे व अस्पृश्यांचे मोठयाप्रमाणात हाल होत होते. मानसांना जनाव
राबवून घेतले जात होते. एकदा असेच एका महाराची मुलगी आजारी पडण्यामुळे, त्याने आपल्या गावकाम
मुलीला शहरात दवाखान्यात जाण्यासाठी एक दिवसाची सुट्टी मागीतली. माञ गावकामगाराला त्याची दय
नाही.शेवटी त्याची मुलगी वारली. हे वार्ता जेव्हा शाहू महाराजांना कळाली तेव्हा त्यांनी त्या वेठबिगार
बोलवून घेतले व त्याला आर्थिक मदत केली, शीवाय त्याच क्षणी वेठबिगार पध्दत बंद केल्याचे आज्ञापत्र
पिढयान पिढया चालत आलेली वेठबिगारी एका क्षणात नाहीशी झाली. ( साळुखे-204 )

शाहू महाराज यांच्यामते, भारतातील सामाजिक उच्चनिचता, अन्याय, व पिळवणुक या दोषांचे
जातिभेदातच आहे.जातिभेद असू दया पण जातिव्देष मात्र नको. असे म्हणणाऱ्या लोकांचा समाचार घेता
म्हणतात, हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास, त्यांच्या अज्ञानाची कीव आली पाहीजे असे म्हणत.जाति
मोडण्याचा एकच मार्ग म्हणजे प्रथम सर्व जातिभेद मोडले पाहिजेत.त्यांच्यामते, रोटीबंदी, बेटीबंदी व व्यवसाय
असे तीन निर्बंध जातिव्यवस्थेत होते. या संदर्भात, सभा-परिषदांमधून अस्पृश्य लोकांच्या हाताचे अन्नोदक घे
महाराजांनी रोटीबंदी जाहीरपणे धेडकावून लावली होती.तथापि, रोटीबंदीहून बेटीबंदीचा निर्बंध अधिक
होता.हा निर्बंध समाजात जोपर्यंत पाळला जातो.तोपर्यंत जातीभेद समूळ नष्ट होणार नाही, अशी महाराजा
धारणा होती.तथापि, हा निर्बंध जाहिरपणे धुडकाहून त्याप्रमाणे कृती करणे हे खुप अवघड काम होते.मात्र हे का
महाराजांनी केले.कोल्हापूर संस्थानात महाराजांनी, आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देणारा काय
मंजूर केला.महाराजांनी हे केवळ बोलून दाखवले नाही, तर त्यांनी आपल्या चुलत बहिण चंद्रप्रभा हिचा विवा
इंदूरच्या होळकर घराण्यातील पुत्र यशवंत याच्याशी करुन दिला होता.

शाहू महाराजांच्या काळखंडात बलुतेदारी पध्दत अस्तीत्वात होती.त्यामुळे प्रत्येक जातीतील व्यक्तीन
आपल्याच जातीचा व्यवसाय करावा लागत होता. त्यामुळे व्यक्तींची मोठी कुचंबना होत होती. व्यक्ती स्वातंत्र्यावर
गदा येत होती. शाहू महाराजांनी 22 फेब्रुवारी 1918 रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये जाहिरनामा प्रसिध्द
करून संस्थानातील बलुतेदारी पध्दती खालसा करण्यात आली. या कालखंडात केवळ ब्राम्हणच नव्हे तर इतर वरीष्ठ
जाती सुध्दा दलीतांना अस्पृश्य मानत असे व शिवाशीव करत नव्हते. मात्र महाराजांनी आपल्या कालखंडात



Scanned with OKEN Scanner

अस्पृश्यांच्या हातचे अन्नोदक स्वीकारण्याचे अनेक जाहीर कृत्ये केलीत. ज्यामुळे अस्पृश्यतेच्या प्रथा, परंपरा मोडीत काढण्यास मदत झाली.

1908 मध्ये शाहू महाराजांनी न्यायदान व्यवस्थेत अस्पृश्यांना दर्जा प्राप्त व्हावा म्हणून, अस्पृश्य व्यक्तींना अल्पशिक्षित असताना देखील, जाणिवपूर्वक वकीलीच्या सनदा देण्यास सुरूवात केली. ब्राम्हणेत्तरांना वकिलीच्या सनदा देणे हे त्यांचे धोरण वरिष्ठ जातीच्या लोकांना आवडले नाही.त्यांच्याकडून त्यासंबधी ओरड सुरू झाली. तेव्हा नागपूर येथे 30 मे 1920 रोजी भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना शाहू छत्रपतींनी पुढील शब्दात महार, मांग, तरुणांनना ज्या वकिलीच्या सनदा दिल्या, त्यांचे समर्थन केले. "ज्या महार, मांगास मी वकीलीच्या सनदा दिल्या, त्यांच्यापेक्षा विद्येने व आकलेने कमी अशा, पुष्कळ वरिष्ठ जातीच्या लोकांस कित्येक देशी संस्थानांतून वकीच्या सनदा देण्यात येतात, याबद्यल मात्र समाजास काही कमीपणा वाटत नाही."

वरील बाबींशिवाय सरकारी कचेऱ्या, दवाखाने, शाळा, सरकारच्या मदतीवर चालणाऱ्या खाजगी शाळा, पाणवठे या सर्व ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश राहील, त्याचप्रमाणे कचेऱ्यात असणाऱ्या अस्पृश्यनोकरांना सवर्ण अधिकारी किंवा इतर अधिकारी यांनी अस्पृश्य म्हणून अपमानकारक वागणूक दिल्यास त्यांना राजीनामा द्यावा लागेल. सरकारी किंवा सरकारी मदतीवर चालणाऱ्या शाळांमधून अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मानहानिकारक वागणूक दिल्यास त्यांना नोकरी सोडावी लागेल. तसेच एखाद्या डॉक्टराकडून अस्पृश्य रोग्याला तपासण्यासाठी स्पर्श करण्यास नाकार दिल्यास त्याला आपल्या नोकरीचा त्याग करावा लागेल. अशा सर्व महत्वाच्या तरतुदी असणारे चार वटहुकूम 1919 साली काढले होते.

वरील विवेचनाहून असे दिसून येते की, राजर्षी शाहू महाराज हे एक कर्ते समाजसुधारक होते बोलके नव्हे.त्यांनी अस्पृश्याता निवारण विषयक केवळ विचार मांडलेनाही तर ते विचार प्रत्यक्षात उतरवून दाखवले.दलीतांना सुखसमृध्दीचे जीवन जगता यावे, त्यांना मुलभूत अधिकार मिळावेत यासाठी ते आयुष्यभर झटले.

संदर्भ:


1. डॉ. पवार, जयसिंगराव (2012). राजर्षी शाहू छत्रपतीजीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रवोधनी, कोल्हापूर.
2. जाधव, रमेश 2012. राजर्षी शाहू छत्रपती, नॅशनल वुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली.
3. सांळुखे, नानासाहेव(2008). शाहूंच्या आठवणी, वृपाली प्रकाशन, कोल्हापूर.
4. दोषी व जैन, (2010). सामाजिक अनुसंधानए रावत पब्लीकेशन, जयपूर .

Est. Year : 1998

Janata Shikshan Prasarak Mandal's

# MAHILA KALA MAHAVIDYALAY, AURANGABAD

Affiliated to Shreemati Nathibai Damodar Thackersey Womens University, Mumbai

Organized One Day Interdisciplinary National Conference on

## Thoughts and Works of Indian Social Reformers

आज़ादी का अमृत महोत्सव

# Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms/ डॉ. गणेश तुकाराम मोकासरे

Of सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव. जि. बीड

has participated in the One Day Interdisciplinary National Conference held on 1st October 2022 as a Key Note Address/Chair Person/Resource Person/Participant/Research Student. He / She has presented the research paper entitled "शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन."

**Dr.Sainath R.Bansode**
Convener & IQAC Cell
Assistant Professor & Head, Dept.of Sociology
Mahila Kala Mahavidyalay, Aurangabad

**Dr. Ramkishan N.Dahiphale**
Principal
Mahila Kala Mahavidyalay,
Aurangabad

Scanned with OKEN Scanner




Editor
Dr.Bapu G. Gholap

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

**Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon, Dist: Beed (MS)**

(NAAC Re-Accredited 'A' Grade with CGPA 3.21)

Interdisciplinary National Conference on

**"Social & Political Problems in India: Challenges & Remedies"(SPPICR-2022)**

**20th December 2022**

**Special Issue**

**Editor**

| Dr. G. T. Mokasare | Dr. A. S. Pentawar | Dr. G. K. Sanap |
|---|---|---|
| Convenor | Organizing Secretary | Principal |

**Co-Editor**

| Dr. N. K. Muley | Mr. B. R. Bodke | Dr. D. S. Shinde |
|---|---|---|
| Co-Convenor | Co-Convenor | Co-Convenor |

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

14) भारतातील प्राचीन वास्तूंचे संवर्धन एक आव्हान
सहा. प्रा. डी.एन रिठे, जि. बीड ||53

15) संवैधानिक संस्थांचा गैरवापर :एक राजकीय समस्या
डॉ. अरुण पेंटावार, जिल्हा—बीड ||55

16) समाज माध्यमे आणि युवक
डॉ. आर. बी. काळे, जि. बीड ||58

17) भारतातील पक्षपद्धती आणि राष्ट्रीय पक्ष
श्री महेश अभिमन्यू मोहिते, जि. बीड ||60

18) भ्रष्टाचार (Corruption)
प्रा.डॉ.दिपक मोहनराव बुक्तरे, हनुमान अशोकराव रासवे, औरंगाबाद ||66

19) युवकांमधील मद्यपानाची कारणे व परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास
महादेव सोपानराव घाटूळ, औरंगाबाद ||71

20) भारतीय लोकशाही पुढील आव्हान : दहशतवाद
डॉ. जाधव श्रीराम, माजलगाव ||75

21) महाराष्ट्रातील आदिवासी विषयक माहिती : एक भौगोलिक अभ्यास
शितकरधनंजय रमेश, डॉ.सोनवणे श्रीराम विक्रम,माजलगांव ||77

22) मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय
डॉ. गणेश तुकाराम मोकासरे, डॉ. शामसुंदर आसाराम आगे, जि. बीड ||79

23) भारतातील सामाजिक व राजकीय समस्या : आव्हाने व उपाय
श्रीमती संजीवनी डावकर—तांगडे, डॉ. तिडके एन. आर ||83

24) तरुणांमधील सोशल मीडियाची व्यसनाधीनता: एक सामाजिक समस्या
डॉ. अंकुश एम. गोंडगे, कोल्हापूर ||86

25) कृषी कायदे २०२० व शेतकरी आंदोलनाची चिकित्सा
डॉ. ज्ञानराजा चिघळीकर, डॉ. महेश चौगुले, गडहिंग्लज ||90

26) बेरोजगारी
स्वाती आश्रुबा देवतर्शे ||95

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

३) आदिवासी जमातीमध्ये अनेक भाषा बोलल्या जातात. आदिवासीचा धर्म हा क्षत्रिय असतो.
४) आदिवासी समाजात परंपरेला प्राध्याने दिलेले असते. परंपरेनुसार कथा, नृत्य, काव्य,या माध्यमाद्वारे आपल्या परंपरा जपत असतात.
५) या समाजामध्ये एक जिनशी पणा जास्त प्रमाणात आढळतो. लोकांच्या वागण्यात एक सारखेपणा दिसून येतो.
६) आदिवासी समाजात व त्याच्या धर्मात निसर्ग पुजा व जादूसारख्या क्रियाकल्पास महत्व असते.

**८) आदिवासी जमातीच्या समस्या :**
१) हा समाज जंगल व पर्वतीय प्रदेशत राहत असल्यामुळे शिक्षणापासून वंचित आहे.
२) या जमातीमध्ये जुन्या रूढी परंपरा व अंधश्रध्दा अवगत असल्यामुळे मागासलेपण मोठ्या प्रमाणात आहे.
३) या जमातीमध्ये मांसाआहाराचे प्रमाण जास्त असल्यामुळे कच्चे मांस खाण्यामुळे शारिरीक आजार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.
४) ही जमात निरक्षर असल्यामुळे बालविवाह पध्दत मोठ्या प्रमाणात दिसून येते.
५) आदिवासी जमातीमध्ये लहान बालकांच्या संख्येत कुपोषणाची समस्य निर्माण झालेली आहे.

**९) निष्कर्ष :**
१) आदिवासी जमात ही दूर्गम भागात वास्तव्यात असल्यामुळे अनेक सुविधापासून वंचित असणारी जमात म्हणून ओळखली जाते.
२) आदिवासी जमातीत अंधश्रध्दा जास्त प्रमाणात असल्यामुळे लोकांचे जीवण धोक्यात आलेले दिसून येते व हे लोक मागासलेपणामध्येसुख मानून जीवन जगतांना आढळतात.
३) आदिवासी जमातीसाठी महाराष्ट्र शासनाने अनेक ठिकाणी आदिवासी विकास महामंडळे, प्रकल्प निर्माण केलेले आहेत.परंतू त्या प्रकल्पाचा पाहिजे तेवढा फायदा अजून झालेला दिसून येत नाही.
४) आदिवासी जमातीची लोकसंख्या ही संथगतित वाढत आहे.

**१०) संदर्भ :**
१) ए.बी.सवदी (२००३), मानवी लोकसंख्या भुगोल, प्रकाशन निराली प्रकाशन,पूणे.
२) डॉ.पाथरे (२००९), मानवी भुगोल, प्रकाशन शशिकांत पिंपळापूरे,औरंगाबाद
३) डॉ.सुरेश फूले (२००९), महाराष्ट्राचा भुगोल प्रकाशन शशिकांत पिंपळापूरे,औरंगाबाद
४) के.ए.खतीब (२०११) लोकसंख्या भुगोल प्रकाशन शशिकांत पिंपळापूरे,औरंगाबाद
५) महाराष्ट्र सांख्यकीय आकडेवारीचा आढावा (२०११) प्रकाशन उमेद महाराष्ट्र शासन.
६) महाराष्ट्र वार्षिक रिपोर्ट.

**22**

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय

डॉ. गणेश तुकाराम मोकासरे

डॉ. शामसुंदर आसाराम आगे
समाजशास्त्र विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगांव जि. बीड

**********

**प्रस्तावना:** पूर्वीच्या काळी उत्तम शेती मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी अशी समाज धारणा रूढ होती शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हणून संबोधले जाते. शेतकरी हा पुरातन काळापासून वैभव संपन्न गणला जातो. भारत हा कृषिप्रधान देश असला तरी गेल्या ७० वर्षापासून शेतीकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. तरीही उत्पन्न वाढले आहे शेती समृद्ध आणि शेतकरी गरीब हे चित्र न समजणारे आहे. निसर्गाचा कोप कमी उत्पादकता वाढता खर्च व घटते उत्पन्न आणि कर्जबाजारीपणा अशा या निर्दयी दृष्टचक्रात शेतकरी सतत अडकलेला असतो. हजारो वर्षापासून ही स्थिती आहे शेतकरी सुखी झाला आहे आणि आर्थिक दृष्ट्या मजबूत झाला आहे असे कधी ऐकण्यात येत नाही. भारतीय शेतकरी हा जवळजवळ १२१ कोटी लोकांचा पोशिंदा आहे असं जेव्हा अभिमानाने बोललं जातं त्यावेळी तो अडचणीत सापडला असताना त्याला मानसिक आर्थिक सामाजिक आधार देण्यासाठी कोणीही पुढे सरसावत नाही ते यातील दुर्दैवी शोकांतिका आहे शेती हा त्यांचा व्यवसाय आहे आणि त्यातून त्याला अर्थ निर्माण करावयाचा आहे शेतीव्यतिरिक्त इतर त्याला काही येत नाही. याबाबतचे दु:ख भावना म. ज्योतिराव फुले यांनी आपल्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाद्वारे मांडले आहे.

आज उत्तम नोकरी मध्यम व्यापार व कनिष्ठ



Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

Guest Editor :
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

Associate Editors -
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | **डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड** | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | **डॉ. केशव लहाने** | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | **डॉ. किरण चक्रे** | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | **डॉ. राखी सलगर** | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | **डॉ. रमेश वाघमारे** | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | **डॉ. साहेब राठोड** | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | **डॉ. सिद्धेश्वर सटाले** | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | **डॉ. डी.एस.शिंदे** | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | **डॉ. शिवाजी चौगुले** | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | **डॉ. शिवराज पाटील** | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | **डॉ. सुनिल जाधव** | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | **डॉ. सुरेश सामाले** | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | **डॉ. टी.आर.फिसफिसे** | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | **डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे** | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | **गौरव पाटील** | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | **डॉ. संदीपान गायके** | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | **डॉ. जे.एस.ढवळे** | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | **डॉ. जयसिंग सिंगल** | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | **दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर** | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | **प्रा. नंदकुमार कुकलारे** | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | **मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत** | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | **डॉ. जयदेव मोहिते** | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | **नितीन क्षीरसागर** | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | **डॉ. सय्यद मुसा** | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | **डॉ. अनंत नरवडे** | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | **प्रा. वितेश निकते** | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | **प्रा. भारत पल्लेवाड** | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | **डॉ. किरण पिनाटे** | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | **प्रा. आर.एस.पोपळघट** | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | **प्रा. प्रकाश काळवणे** | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | **प्रा. एच.आर.खेत्री** | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | **प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे** | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | **डॉ. आर.के.काळे** | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | **प्रा. संदिप परदेशी** | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | **प्रा. इंदू साळुंके** | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | **प्रा.एल.एस.सिताफुले** | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | **प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे** | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | **डॉ. दत्ता तंगवलवाड** | 579 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रा. आर. बी. काळे**
समाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई

**प्रा. जी. टी. मोकासरे**
सुदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाच्या विकासाचे भवितव्य हे त्या देशातील लहान बालकावर असते. कारण ते बालक मोठे होऊन देशाचे आधारस्तंभ बनतात. जसे की देशाचे नेते, संशोधक, व्यापारी, खेळाडू, सैनिक, शिक्षक, चांगले नागरीक ज्यामुळे राष्ट्रीय संपत्ती निर्माण करणे व संपूर्ण राष्ट्राची काळजी व संरक्षण करतात, व नवसमाज निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असते. 'भारतीय राज्यघटनेच्या १४, १५, १२ ए, २३, २४ (ई) ३९ (फ) या कलमामध्ये बालकाची वाढ आणि विकास या विषयी तरतूदी आहे.

अलीकडील काही वर्षापासून गुन्हेगारी विश्वात बालकाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बालकांचा गुन्हेगारी विश्वातील वाढता सहभाग ही समस्या आता जागतिक समस्या झाली आहे. तसेच दिवसेंदिवस ती अधिक गंभीर स्वरुपात वाढत चाललेली आहे. जागतील विविध राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला. भारताने देखील औद्योगिकीकरणाने वेग घेतलेला दिसून येतो. औद्योगिक केंद्रीकरणामुळे नागरीकरणात देखील झपाट्याने वाढ झाली आहे. आधुनिक काळात नगरांच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. देशाचा चेहरा जसा विकासाचा आहे तर दुसरा चेहरा विविध सामाजिक समस्याचा आहे. आधुनिक काळात ठळकपणे लक्षात येणारी समस्या म्हणजे बालगुन्हेगारी.

**उद्देश :-**

१) भारतातील बालगुन्हेगारीचा आढावा घेणे.
२) बालगुन्हेगारीच्या कारणाचा अभ्यास करणे.
३) बालगुन्हेगारीवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करुन तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच दुय्यम तथ्य संकलन स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे.

**सैध्दांतीक चौकट :-**

एडविन सुदरलॅड आणि डोनाल्ड क्रेझी यांनी 'विभेदित साहचर्य' या आधारावर बालगुन्हेगारी विषयी मांडणी केली आहे. 'विभेदित सहाचर्य' या शब्दातून असे सांगायाचे आहे की व्यक्ती ज्यांच्या संगतीत राहील, म्हणजे तिचे साहचर्य प्रस्थापित होईल त्याच लोकांचे वर्तन प्रकार, मुल्ये, श्रध्दा, नियमणे इ.गोष्टीचे संपादन त्या व्यक्तीकडून होईल. मुल जेव्हा चांगल्या मुलांच्या संपर्कात राहून वर्तन करेल तेव्हा ते वर्तन अनुचलनात्मक स्वरुपाचे होईल. पण याउलट मुले जर वाईट वा विचलनात्मक वर्तन करणाऱ्या लोकांच्या सतत संपर्कात आली तर ती मुले देखील विचलनात्मक वर्तन करणारीच होईल. मुले जर इतर बालगुन्हेगारांच्या संगतीत रहिली तर ती ही बालगुन्हेगारच होतील. थोडक्यात, ज्यांच्याशी घनिष्ठ साहचर्य प्रस्थापित होईल त्यांच्याकडून अधिक प्रभावीरित्या व्यक्तीचे समाजीकरण घडून येईल व तसे प्रत्येकाचे वर्तन निश्चीत होते.



Scanned with CamScanner

क्लिफोर्ड शॉ आणि हेरी मॅक के. यांच्या मते समाजीकरणात सामन्य मुले समाजातील रुढ नियमानुसार वागण्यास शिकतात. समाजमान्य वर्तन प्रकाराचे समाजीकरणात समाजातील सर्व मुलांकडून अध्ययन होते. पण ते विचलनात्मक मानलेल्या वर्तन प्रकाराचे अध्ययन असते. समाजाच्या आदर्श संस्कृतीचे समाजीकरणाव्दारे जसे संक्रमण घडून येते अगदी त्याच प्रमाणे बालगुन्हेगारी संस्कृतीचे समन्यक बालगुन्हेगारांच्या समूहाव्दारे संक्रमण घडून येते.

**बालगुन्हेगारीचा अर्थ :-**

**न्युमेयर :-**

'बालगुन्हेगारी म्हणजे कायद्याने निर्धारीत केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेली व्यक्ती,ज्या व्यक्तीचे वाईट वर्तन समाजविरोधी आणि कायद्याचे उल्लंघन करणारे असते.'

**मार्शल बी क्लिनार्ड :-**

'विशिष्ठ वयाखालील विशेषत : १६ ते १८ वर्षाखालील व्यक्तीनी इतर व्यक्तींना किंवा समाजाला घातक ठरेल अशा रितीने केलेले समाज विरोधी कृत्य म्हणजे बालगुन्हेगारी होय.'

**विल्यम एच शेल्डन :-**

'बालगुन्हेगारी म्हणजे समाजाच्या अपेक्षित अपेक्षाचा भंग करणारे बालकांचे वर्तन.'

वरील व्याख्यानुसार असे दिसुन येते की कायद्याच्या वयाच्या अटीत बसणाऱ्या व्यक्तीने केलेले समाजविरोधी कृत्य हे बालगुन्हेगारीच्या निर्मीतीस कारणीभुत ठरते. बालगुन्हेगारीमध्ये फक्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बालकांनाच नव्हे तर समाजविरोधी वर्तन करणाऱ्या बालकाचाही समावेश दिसुन येतो. म्हणूनच बालगुन्हेगारी या समस्येच्या अंतर्गत फक्त कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या बालकाबरोबर समाजविघातक कृत्ये करणाऱ्या बालकांचा समावेश होतो.

**भारतातील बालगुन्हेगारीची स्थिती :-**

आजचा बालक असो व तरुण हा उद्याचा सुजान नागीक असतो. या युवा पिढीवरच देशाची आर्थीक सामाजिक प्रगती अवलंबून असते. आजची युवा पिढी सक्षम असणे अतिशय आवश्यक आहे. परंतु गुन्हेगारीचे बदलते स्वरुप पाहता सद्यस्थितीत देशात अल्पवयीन मुले तरुण होण्याच्या आधिच गुन्हेगारीकडे वळत आहे. भारतात एकूनच गुन्हेगारीत प्रचंड अशी वाढ होत आहे. छोट्या -मोठ्या चोऱ्या, घर फोड्या, खुन,दरोडे, बिशेषत अल्पवयीन मुलांकडून बलत्कार, या सारख्या गुन्हायामध्ये वाढ ेत आहे. "देशामध्ये २०१० साली २२७४० बाल गुन्हेगाराची संख्या होती. २०११ मध्ये २५१२५ तर २०१२ मध्ये २७९३६ एवढी तर २०१३ मध्ये ३१७२५ व २०१४ मध्ये ३३५२६ एवढी बालगुन्हेगाराची संख्या होती. बाल गुन्हेगारी इंडियन पॅनल कोड (IPC) नुसार २०१० ते २०१४ पर्यंत ४७ टक्के बालगुन्हेगारी वाढली आहे.

या वरुन असे लक्षात येते की भारतामध्ये बालगुन्हेगारी समस्येचे विदारक चित्र निर्माण झाले आहे.

**बालगुन्हेगारीचे कारणे :-**

*** कौटुंबीक कारण :-**

समाजीकरणाचे साधन म्हणून कुटुंबाला महत्त्व आहे. मुलांच प्राथमिक सामाजीकरण कुटुंबातच मुख्यत होते. कुटुंबातील आई-वडील,मोठे भावंडे यांच्याकडून मुलांचे सामाजीकरण होते. समाजातील शिस्तीचे नियम, इतर नियमणे, मूल्ये याचे ज्ञान कुटुबांत होते. भावी काळात करावयाच्या काही भुमिका मूल कुटुबात शिकते. त्यामुळेच कुटुंबातील व्यक्तीकडून अत्यंत प्रमाणीकरीत्या समाजीकरण नीट झाले नाही तर त्यांच्या व्यक्तीमत्त्वात गंभीर उणीवा राहू शकतात. आधुनिक काळात कुटुंब पध्दतीत मोठ्या प्रमाणात विघटन होत असल्यामुळे कुटुबपध्दतीत लहान मुलांवर लक्ष ठेवण्यास



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
October-2019

आणि त्यांच्यावर संस्कार करण्यास मर्यादा येतात. लहान मुले अनुकरणप्रिय असतात. कुटुंबातील सदस्याची व्यसनधीनता, भांडणे, चुकीचे वर्तन यांचा प्रभाव मुलांवर पडणे स्वभाविक आहे. पती-पत्नी मधील भांडण, घटस्फोट, अनैतिक संबध या बाबी बालगुन्हेगार निर्माण करण्यास जबाबदार ठरतात.

**समाजिक माध्यमे :-**

मोबाईलमध्ये इंटरनेट, चित्रपट सुविधा अशा माध्यमातून मुले चांगल्या गोष्टी न घेता वाईट गोष्टीकडे लवकर आकर्षीत होतात. ज्या वयात योग्य संस्कार व्हायला पाहिजे ते मात्र होताना दिसत नाही. आई-वडील दोघेही नोकरी, व्यवसाय निमीत्ताने दिवसभर बाहेर राहतात अशा वेळेस बालके घरी एकटेच राहत असल्यामुळे चित्रपट,गुन्हेगारीच्या मालिका, अश्लिल चित्रपट यातील पात्राचे अनुकण करण्याच्या प्रयत्नातून अपहरण, मारामारी, धुम्रपान,खुन,बलात्कार अशा घटना करण्याचा प्रयत्न करतात म्हणून त्यांच्याकडून गून्हे घडून बालगुन्हेगारीचा प्रश्न निर्माण होतो.

**आर्थीक कारण :-**

भारतातील अनेक सामाजिक समस्या या आर्थीक कारणामुळे निर्माण होतात. बालगुन्हेगारी हे सुध्दा त्याचेच एक कारण आहे. मुलांच्या प्राथमिक गरजा भागविल्या जात नसतील तर मुलांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. गरीब - श्रीमंतामधील दरी अशा गोष्टी त्यांना समाजविरोधी वर्तन करण्यास भाग पाडते. आर्थीक परिस्थिती त्यांच्या गरजांच्या पूर्ण करत नाही तेव्हा या मुलांच्या हातुन छोटी - मोठी चोरी करुन गरजा पूर्ण करीत असतात. हळूहळू त्यांना अशा प्रकारची समाज विरोधी वर्तन करण्याची सवय लागून ती बळावली जाते.

**सामाजिक वातावरण :-**

लहान मुलांवर केवळ कुटुंबाच्या माध्यमातून सामाजीकीकरण घडवून येते असे नाही तर सभोवतलच्या सामाजिक परिसराचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष स्वरुपात मुलांवर प्रभाव पडत असतो. जर आजूबाजूच्या सामाजिक परिसर असंस्कारक्षय असेल तर मुलांना आपोआप या परिस्थितीत वाईट गोष्टी, संगत करुन शिकायला वेळ लागत नाही. झोपडपट्टीच्या क्षेत्रात जुगार, मद्यपान, धुम्रपान, व्याभिचार, अनैतिकता, चोऱ्या, शिव्या, अश्लिल शब्दाचा उच्चार या सारख्या बाबी सातत्याने घडत असतात याचाच परिणाम कळत नकळत मुलांवर होवुन मुले त्या प्रवृत्तीकडे झूकून जातात.

**औद्योगिकीकरण व नागरीकरण :-**

भारत देश हा महासत्तेकडून वाटचाल करत असून त्याच बरोबरीने औद्योगिकीकरण व नागरीकरणामध्ये वाढ होत आहे. परंतु त्याचबरोबर वाढत्या नागरीकरणाबरोबर गलिच्छ वस्त्या, झोपडपट्टी, गुन्हेगारी, मद्यपान, वेश्यालये इ. समस्यांची वाढ होत चालली आहे कारण उद्योगधंद्यांच्या ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने ग्रामिन भागातून नागरी भागामध्ये स्थलांतराची वृत्ती वाढली आहे. जागेच्या टंचाईमुळे झोपडपट्यासारख्या भागात गरीब, श्रमीकवर्ग, अकुशल कामगार, भिकारी इ. लोक राहतात. परंतु ज्याच्यांकडे वेळ नाही त्यांच्या मुलाकडे आपोआप दुर्लक्ष होते. यामुळे मुलांमध्ये समाजीकीकरण संस्कार या गोष्टी रुजत नसल्यामुळे त्यांच्याकडून समाजविरोधी वर्तन, मद्यपान, स्वैराचार, गुन्हेगारी करण्याकडे प्रवृत्ती वाढते त्यातून बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.

**उपाययोजना :-**

बालगुन्हेगार आणि प्रोढ गुन्हेगार यांच्यात फरक असतो. आजचा बालगुन्हेगार उद्याचा मोठा गुन्हेगार होवु नये यासाठी विविध देशामध्ये बालगुन्हेगारी सुधार कार्यक्रम राबविले जातात. भारतात या संदर्भात राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमामध्ये १९२७ मध्ये मुंबईमध्ये बाल न्यायालयाची स्थापना करण्यात आली, बाल अभिक्षण गृह, भारतात जिल्हा



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
October-2019

स्तरावर बालसुधार संस्था निर्माण करण्यात आली आहे. सुधार शाळा, परिवीक्षा वसतीगृह किशारे सुधारगृह, अट्टल बालगुन्हेगारांना भविष्यातील गुन्हेगार बनन्यापासुन वाचविण्यासाठी बालग्राम योजना अंमलात आणली आहे.

परंतु मुळातच बालगुन्हेगार निर्माण होवु नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी बालकांचे योग्य समाजीकीकरण होणे आवश्यक आहे. कारण समाजीकीकरणाच्या प्रक्रियेतून भूमिका पार पाडत असतो. त्यासाठी कुटुंब, शेजारी शाळेमध्ये या विषयी सुधारणा होणे आवश्यक आहे. मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्यास आर्थीक कारणामुळे होणाऱ्या बालगुन्हेगारीच्या समस्या कमी होतील. सोशल माध्यमातून दाखविल्या जाणाऱ्या वाईट गोष्टी तसेच मोबाईलमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून येणाऱ्या अश्लिल जाहिराती चित्रपट न दाखविणे यामुळे लहान मुलांवर त्याचा परिणाम होणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने वागणे जेणे करुन सामाजीक पर्यावरणाचा चांगला परिणाम मुलांवर होवुन मुले गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर राहतील. एवढेच नाहीतर नैतिक, मुल्ये, नियमणे शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून मुलांमध्ये रुजविल्यास बालगुन्हेगार निर्माण होणार नाही. तसेच सर्व शाळा, महाविद्यालयामध्ये लहान बालकापासुन ते युवकापर्यंत्न संवाद साधून मुलांच्या मनातील भावनांना वाट मोकळी करुन देणे.

**सारांश :-**

थोडक्यात बालगुन्हेगारीची समस्या ही कोणत्याही देशाच्या विकासामध्ये घातक ठरत आहे. समाजशास्त्रीय सैध्दांतीक मांडणीवरुन असे लक्षात घेता येते की सामाजिक विचलन ज्या कारणामुळे होते त्यामध्ये समाजीकीकरण ही प्रक्रिया सर्वात महत्त्वाची आहे. त्यामुळे बालगुन्हेगारी निर्माण न होण्यासाठी आदर्श संस्कृतीचे समजीकरणाव्दारे संक्रमण घडून येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येकाचे अनुचलनात्मक वर्णन निश्चीत होईल. गुन्हेगारीच निराकारण होण्यासाठी एकदंरीत सामाजिक परिस्थितीत परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१. कुलकर्णी, पी.के, भारतातील सामाजिक समस्या, १९९८ विद्या प्रकाशन, नागपुर.
२. साळुखे सर्जेराव, मुलभूत समाजशास्त्रीय संकल्पना, २००० नरेंद्र प्रकाशन, पुणे.
३. आहूजा, राम, सामाजिक समस्याऐं, २००० रावन पब्लिकेशन, जयपूर.
4. www.tarunbharal.com,dated 02/09/2019.
5. www.indiaspend.com dated 03/09/2019.



Scanned with CamScanner

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# वृद्धांच्या समस्या कारणे आणि उपाय





संपादक
डॉ.बाळासाहेब मुंडे

Scanned with CamScanner

25) वृध्दांच्या समस्या व निर्मितीचे कारणे
डॉ. ज्ञानोबा दशरथ फड ||87

26) Legal & Constitutional Framework Of Older Persons In India: An Overview
Mihir Umesh Inamdar, Pune ||89

27) भारतातील वृद्ध समस्येची कारणे व वृद्ध कल्याणकारी कार्यक्रम
प्रा. डॉ. सिद्धेश्वर रा. शेटकर, लातूर ||93

28) वृध्दांच्या समस्यांची कारणे व परिणाम
प्रा.डॉ. पंढरी व्यंकटी गुट्टे, परळी-वैजनाथ ||96

29) वृद्धासंबंधीचे कायदे आणि योजना
डॉ. साधना विजय लांजेवार, नागपूर ||98

30) Old Age Problems Indian Perspective
Dr. Balaji P. Munde, Jalna ||101

31) वृद्धांच्या समस्या : कारणे, परिणाम आणि उपाय
प्रा.डॉ. दामावले डी. एन., लातूर ||104

32) वृध्दांच्या समस्या आणि महाराष्ट्र शासनाचे वृध्दांसाठीचे कल्याणकारी कार्यक्रम
डॉ.दिलीप सिताराम मस्के, अंबाजोगाई ||107

33) वृध्दांच्या समस्या :- कारणे आणि उपाय
डॉ.सुनिल जाधव, प्रा.भोसले ए.आर, बीड ||110

34) भारतातील वृध्दांच्या समस्या
मोकासरे गणेश तुकाराम, माजलगाव ||113

35) Problems, Causes and Remedies of the Elderly
Ms. Pratima Kamlakar Kamble, Nanded ||115

36) Problems of the Aged People in India: An Analysis
Prof. Balaji Pidge, Osmanabad ||118

37) वृध्दांच्या समस्या आणि उपाय
प्रा. धिमधीमे किरण कुमार मोहन, केज ||121

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

34

# भारतातील वृध्दांच्या समस्या

**मोकासरे गणेश तुकाराम,**
समाजशास्त्र विभाग,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना :**

भारताची ओळख तरूणांचा देश म्हणून आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये भारतात वृध्दांची संख्याही झपाटयाने वाढत आहे त्यामुळे ही भारतासाठी गंभीर बाब आहे. त्यातल्या त्यात वृध्दांकडे होणारे दुर्लक्ष व त्यांच्या वाढत्या समस्या यामुळे ही समस्या दिवसेंनदिवस उग्र बनत आहे.पुर्वी भारतामध्ये आई वडीलांकडे देवा समान बघीतले जात होते. मातृ पितृ देवो भवः असे संबोधल्या जायचे. आई वडीलांची सेवा करणार श्रावण बाळ हा आदर्श पुत्र ठरायचा. आज मात्र समाजव्यवस्थेत अमुलाग्र बदल झालेले आहेत. आधुनिकीकरण व जागतिकीकरण यामुळे सामाजिक निती, मूल्यांची घसरण होत आहे. आई वडीलांना संभाळायला कोणीही तयार नाहीत. सुशिक्षित व श्रीमंत मुले ही कुटूंबातील वृध्दांची हेळसांड करतांना दिसत आहे.

वृध्द ही एक अशी संकल्पना आहे की, ज्या मध्ये व्यक्ती सरासरी आयुर्मानापर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक जीवन जगत आहे. जगातील सर्वच व्यक्तींचे सरासरी आयुर्मान हे समान असू शकत नाही. कारण आहार विहार, स्थळ, वैद्यकीय सेवांची उपलब्धता यासर्व बाबींमुळे वेगवेगळया देशातील लोकांचे आयुर्मान वेगवेगळे आहेत. भारतातील १९९९ च्या वृध्दांच्या राष्ट्रीय धोरणा नुसार भारतातील सरासरी वय हे ६० ठरवण्यात आलेले आलेले आहेत. आलिकडच्या काळात त्यात वाढ होउन ते ६४ पर्यत झालेले आहे.

**भारतातील वृध्दाचे प्रमाण**

| स्त्रोत | महिला | पुरूष | शहर | ग्रामीण | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| जनगणना-१९८१ | ६.६ | ६.४ | ६.८ | ५.४ | ६.५ |
| जनगणना-१९९१ | ६.८ | ६.७ | ७.१ | ५.१ | ६.८ |
| जनगणना-२००१ | ७.८ | ७.१ | ७.७ | ६.७ | ७.४ |
| NSSO Survey २००७-२००८ | ७.७ | ७.३ | ७.६ | ७.२ | ७.५ |

(Sourse:Situation of analysis of elderly in India)



Scanned with CamScanner

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, भारतामध्ये दिवसेंन दिवस वृध्दांच्या संख्यामध्ये वाढ होत आहे. भारतामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार वृध्दांची संख्या ७.४% एवढी आहे. त्यामध्ये पुरषांचे प्रमाण हे ७.१% तर स्त्रीयांचे प्रमाण ७.८% आहे. तर NSSO च्या २००७-०८ च्या अहवालानुसार भारतामध्ये वृध्दांचे प्रमाण ७.५% असून शहरात वृध्दाचे प्रमाण ७.६% तर ग्रामीण समुदायात ७.२% आहे. ६६ ते ६४ वयोगटातील वृध्दांचा मृत्युदर २० ( दर हजारी ) आहे, ७५-८९ वयोगटातील ८० तर, ८५ पेक्षाअधिक वयातील वृध्दाचा मृत्युदर हा २०० आहे.

**वृध्दांच्या प्रमुख समस्या :-**

**१. कुटूंबापासून दूरावा :-** आजच्या चंगळवादी व भौतिकवादी समाजव्यवस्थेत माता पित्याचा आदर सन्मान व त्यांच्याप्रती आसलेले कर्तव्य नवीन पिढी विसरत चाललेली आहे. अनेक तरुण आई वडीलांना सोडून शहरकडे राहतांना दिसतात. आज तर अनेक परदेशात शिकणारे युवक आपल्या माता पित्यांच्या अंत्यसंस्कारालाही येत नसल्याचे दिसते.ज्या आई वडीलांनी आयुष्याभर कष्ट करून शिकवल मोठ केले व नोकरीला लावलं तीच मुले वृध्दकाळात आई वडीलांना सोडून जातात. त्यामुळे उतरत्या वयात वृध्द आपल्या कुटूंबा पासून तुटतात व एकाकी जीवन जगताना दिसून येत आहे.

Situation of Analysis of Elderly in India(२०११) च्या अहवाला नुसार ७५% पुरूष व ४०% स्त्रीया हया त्यांच्या जोडीदारा सोबत राहतात तर २०% पुरूष व ५०% महिला त्याच्या मुलांसोबत राहतांना. यावरून असे दिसून येते की, बहूतांश वृध्द त्याच्या मुलांपासून वेगळे राहतात.

**२. आर्थिक परावलंबन :-** एका विशिष्ट वयापर्यंत व्यक्ती काम किंवा कष्ट करू शकते व पैसा कमवू शकते. त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत असतो, परंतु वय वाढल्यानंतर व्यक्तींना कष्टाचे कामे करता येत नाही व ते आपला उदरनिर्वाहासाठी दुसऱ्यावर आवलंबुन राहतात. पेशन धारक वृध्द सोडल्यास सर्व वृध्द दुसऱ्यांवर परावलंबी बनतात.

**वृध्दांचे परावलंबत्व दर्शवणार तक्ता (आकडेवारी % मध्ये)**

| विभाग | परावलंबन नाही | काही प्रमाणात परावलंन | पुर्णतः परावलंबन |
|---|---|---|---|
| ग्रामीण पुरूष | ५१ | १५ | ३२ |
| ग्रामीण स्त्रीया | १४ | १२ | ७२ |
| ग्रामीण व्यक्ती | ३३ | १४ | ५२ |
| शहरी पुरूष | ५६ | १३ | ३० |
| शहरी स्त्रीया | १७ | १० | ७२ |
| शहरी व्यक्ती | ३६ | ११ | ५२ |

Sources: NSSO २००४

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, ५२% वृध्द हे आर्थिक दृष्टीने परावलंबी आहेत, तर ७२% स्त्रीया हया परावलंबी आहेत. म्हणजेच परावलंबनाचे प्रमाण स्त्रीयांमध्ये जास्त आहेत. Situation of Analysis of Elderly in India(२०११) नुसार, आर्थिकदृष्टया परावलंबन असलेल्या पुरूषवृध्दांना ६-७% जोडीदारांकडून, ८५% मुलांकडून, २% नातवंडाकडून व ६% इतर व्यक्तींकडून आर्थिक मदत होते. तर स्त्रीवृध्दांना १६% जोडीदारांकडून, ७५% मुलांकडून, ३% नातवंडाकडून व ६% इतर व्यक्तींकडून आर्थिक मदत होते.

**३. शारीरिक व आरोग्य विषयक समस्या :** वृध्दपणामध्ये शारिरिक व आरोग्य विषयक समस्या हया सर्रास दिसून येतात.

वेगवेगळया आजाराने शरीर खंगुन जाते. आजच्या पिढी कडुन योग्य सेवा सुश्रुशा केली जात नसल्याने वृध्दांना जीवन नकोसे होते. ग्रामीण भागातील ५५% वृध्दामध्ये तर शहरी भागातील ६३% वृध्दामध्ये शारीरिक व आरोग्य विषयक समस्या दिसून येतात.

**४. अकार्यक्षमता :** (Disability) शारीरिक व आरोग्य विषयक समस्यांमुळे अनेक व्याधी वृध्दामध्ये निर्माण होतात. त्यामध्ये प्रामुख्याने १,००००० वृध्दांमागे १८० मेंटल रोगी आढळून येतात, तर १७३३ ग्रामीण व १०८१ शहरी वृध्दांना अंधळेपणा आलेला आहे, १५५१ ग्रामीण तर १३८५ शहरी वृध्दांना ऐकू येत नाही, १९० वृध्दांना बोलता येत नाही. २७९६ वृध्दांना अपंगत्व आलेले आहेत. यावरून वृध्दांच्या समस्येचे दु:ख आपल्या लक्षात येउ शकते.

**५. भावनात्मक दुरावा :** समाजातील वृध्द व्यक्ती म्हणजे अडगळी पडलेली व्यक्ती होय. काम नसल्यामुळे त्यांना दिवसभरघरात बसून रहावे लागते त्यातच त्याचे आजारपण व त्यांची होणारी कुचुंबना यामुळे ते भावनिकदृष्टया खुपच खचून जातात त्यांना भावनिक आधार दयायलाही कोणाला वेळ नसतो. अनेक कुटुंबामध्ये तर आईला एक मुलगा संभाळतो तर वडीलाला दुसरा मुलगा त्यामुळे दोन जोडीदारांची तुटातुट होते व ते भावनिक दृष्टया पार दुखावले जातात. ते केवळ शरीराने जीवत व भावनेने मृत झालेले शरीर असतात.

**वृध्दाच्या समस्यांची प्रमुख कारणे :**

१. सामाजिक नितीमुल्यांची घसरण
२. भौतिकवाद व चंगळवादी संस्कृती
३. औदयोगीकरण
४. नागरीकरण
५. कौटूबिक संस्काराचा अभाव
६. वाढते आयुर्मान



Scanned with CamScanner